# महाराष्ट्र विधानसभा

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम
## शुक्रवार, दिनांक १८ जुलै, २०२५
## (सकाळी ०९.३० ते १०.४५ वाजेपर्यंत)

**लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :-**

**(बुधवार, दिनांक १६ जुलै, २०२५ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या परंतु पुढे ढकलण्यात आलेल्या लक्षवेधी सूचना क्रमांक १ व २)**

(१) **श्री. मुरजी पटेल, ॲड पराग अळवणी, श्री. दिलीप लांडे, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (गृहनिर्माण) यांचे लक्ष वेधतील :-**

"प्रेमनगर एस.आर.ए. गृहनिर्माण संस्था विलेपार्ले (पश्चिम) मुंबई येथील आठ वर्षांपूर्वी खोल्या पुनर्विकास करण्यासाठी देण्यात येणे, त्यावेळी सदर खोल्यांचे दोन वर्षांचे भाडे देऊन खोल्या ताब्यात घेऊन तोडण्यात येणे, सहा वर्षांचा कालावधी उलटून गेला तरी सदर खोल्यांचे भाडे देण्यात न येणे, सध्या या रिकाम्या जागेवर बांधकाम करुन सदर खोल्या या गृहनिर्माण संस्थेच्या प्रवर्तकांना २५ लाख रुपयांना विकण्यात येणे, झोपडपट्टीतील खोल्या स्थानिक गोर-गरीब खोलीधारकांना दमदाटी करुन परस्पर विक्री करित असणे, या झोपडपट्टी माफियांच्या नावे अनेक गुन्हयांची जुहू, खार आणि सांताक्रुज पोलीस ठाण्यात नोंद असणे, परिणामी सदर सदनिकाधारक व झोपडपट्टीधारकांत भितीचे वातावरण पसरले असणे, तसेच योजना रखडल्यामुळे येथील रहिवाश्यांना आवश्यक मूलभूत सुविधांपासून वंचित रहावे लागणे, सदर सुविधा देण्यासाठी महानगरपालिकेने झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकारणाकडून 'ना हरकत' मागणे, प्राधिकरणाने विकासकामार्फत सदर सुविधा देण्यात येतील असे लेखी आश्वासन देणे, सदर सुविधा पावसाळ्यापूर्वी करुन देणे अपेक्षित असणे, परंतु अद्यापपर्यंत कोणतीही कार्यवाही न झाल्यामुळे स्थानिक रहिवाश्यांना प्रचंड त्रासाला सामोरे जावे लागणे, त्याचबरोबर ही योजना बरीच वर्षे रखडली असल्यामुळे नवीन परिशिष्ट II बनविण्याचीही आवश्यकता असणे, त्यामुळे ह्या झोपडपट्टी माफियांविरुद्ध कारवाई करून स्थानिक सदनिका धारकांचा मूलभूत सुविधांचा प्रश्न तातडीने निकाली काढण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही आणि शासनाची प्रतिक्रीया."

**(२) श्री. किसन वानखेडे, ॲड‍ श्रीजया चव्हाण, सर्वश्री. जितेश अंतापूरकर, बाबुराव कदम कोहळीकर, भीमराव केराम, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खारे विकास महामंडळ) मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"विदर्भातील दुष्काळी, डोंगराळ व आदिवासी भाग असलेल्या यवतमाळ जिल्हयातील अंदाजे १२२४० हे.क्षेत्रास सिंचन लाभ देण्यासाठी सहस्त्रकुंड प्रकल्प प्रस्तावित असणे, या प्रकल्पास मूळ प्रशासकीय मान्यता दि.२०.७.२००९ च्या आदेशान्वये रु.५८३ कोटी किंमतीस देण्यात येणे, तथापि या कामास १६ वर्षाचा कालावधी होऊनही अद्याप सुरुवात न करणे, दरम्यानच्या काळात या प्रकल्पाच्या आराखडयात बदल झालेला असून त्या बदलानुसार सु.प्र.मा. प्रस्ताव तयार करुन तो तांत्रिक छाननीसाठी राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समिती ,नाशिक यांच्याकडे दि.१६.६.२०२५ च्या पत्रान्वये सादर करणे, या प्रकल्पामुळे नांदेड व यवतमाळ जिल्हयातील अंदाजे ३२००० हे क्षेत्र सिंचनाखाली येणार असून २०५ दलघमी पाणीसाठा निर्माण होणार असणे, या डोंगराळ व आदिवासी भागातील जनता, पाळीवप्राणी व वन्य प्राणी यांना मोठा दिलासा मिळणार असणे, या प्रस्तावास तातडीने मान्यता देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली व करावयाची कार्यवाही, याबाबत शासनाची प्रतिक्रीया व भूमिका."

**(गुरुवार, दिनांक १७ जुलै, २०२५ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या परंतु पुढे ढकलण्यात आलेल्या लक्षवेधी सूचना क्रमांक ३ ते ७)**

**(३) श्री. सिध्दार्थ खरात, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे पर्यटन मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"राष्ट्रमाता राजमाता जिजाऊ माँसाहेब यांनी छत्रपती शिवाजी महाराजांसारखे रत्न भारत भूला प्रदान करणे, छत्रपती शिवाजी महाराजांनी संत विचार व महाराष्ट्र धर्माच्या आधारे शिवराज्य स्थापन करणे, शिवाजी महाराजांनंतरही मराठा साम्राज्य व मराठी पताका अटकेपार फडकणे, मात्र छत्रपती शिवाजी महाराजांच्या ख-या अर्थाने असलेल्या गुरू व मातोश्री यांचे पाचाड येथील समाधी स्थळी कोणत्याही सोयी सुविधा नसणे, समाधीस्थळ जवळील असलेली जागा ताब्यात घेऊन तिथे प्रशस्त हॉल, म्युझियम, ग्रंथालय, निवास व्यवस्था व इतर अनुषंगिक सोयीसुविधा करणे आवश्यक असणे, तसेच राष्ट्रमाता जिजाऊंचा पाचाड येथील राजवाडा अत्यंत भग्न अवस्थेत असणे, रायगड व रायगड परिसरात पर्यटन तीर्थस्थळ योजनेअंतर्गत निधी मंजूर असणे, मात्र यातून कोणतीही कामे या राजवाडा दुरुस्तीची न होणे, या निमित्ताने राष्ट्रमाता जिजाऊ जन्मस्थळ असलेले सिंदखेड राजा व समाधी स्थळ असलेले पाचाड येथील समाधी स्थळ व भग्न अवस्थेतील राजवाडा तात्काळ दुरुस्त करण्याची आवश्यकता, छत्रपती शिवाजी महाराज व राजमाता जिजाऊ यांच्या

अनुयायांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण, यावर शासनाने करावयाची तातडीने कार्यवाही याबाबत शासनाची भूमिका."

**(४) श्री. गोपिचंद पडळकर, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे शालेय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"राज्यातील सरळसेवा शिक्षक भरती संवर्गातील बिंदूनामावली मधील तपासणीमध्ये भटक्या जमाती विशेषतः NT-C तसेच VJNT/OBC/SBC/SC/ST प्रवर्गावर झालेला अन्याय दूर करून शिक्षक संवर्गाच्या बिंदूनामावली फेरदुरुस्तीचे आदेश देऊन मागासवर्गियांचा अनुशेष काढून भरती प्रक्रिया राबविणेबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री यांचेकडे माहे मे, २०२५ मध्ये करण्यात आली असणे, याप्रकरणी यापूर्वीही अनेकवेळा शासनाकडे मागणी करुनही कोणतीही कार्यवाही झाली नसणे, राज्यातील शिक्षक भरती सन २०२२ मध्ये जागा उपलब्ध नसून भटक्या जमाती प्रवर्गालाही प्रचलित आरक्षणानुसार जागा उपलब्ध नसल्यामुळे इतर प्रवर्गावर अन्याय होत असणे, तसेच मागासवर्गीय कर्मचारी गुणवत्तेने खुल्या प्रवर्गाच्या कट ऑफ ला सन १९९० पासून ते सन २००४ पर्यंत लागूनही बिंदू बदल करून जातीच्या आरक्षण बिंदू वर दर्शविण्यात आले असल्यामुळे मागास प्रवर्गावर अन्याय झाला असणे, सरळसेवा भरती प्रक्रिया शासन नियमाप्रमाणे राबविली जात नसल्यामुळे मागासप्रवर्गाचा अनुशेष निघत नसणे, सन २००५ ला आरक्षण कायदा आल्यानंतर कर्मचारी आदेशावर निवड प्रवर्ग लिहण्याची पद्धत आली असणे, या सर्व बाबीमुळे मागासवर्गीयांचे आरक्षण अनुशेष निघत नसणे,त्यामुळे बिंदूनामावली तपासणी करताना निवडसूची शिवाय दुसरा पुरावा ग्राह्य धरू नये, अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे केली असणे, त्यानुषंगाने राज्यातील शिक्षक भरती संवर्गातील बिंदूनामावलीमध्ये भटक्या जमाती प्रवर्गावर झालेला अन्याय दूर करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

**(५) श्री.काशिनाथ दाते, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे ग्रामविकास व पंचायत राज मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"ग्रामविकास विभागाअंतर्गत लेखाशीर्ष २५१५ १२३८ या योजनेअंतर्गत दिनांक ३ ऑक्टोबर, २०२४ रोजी शासन निर्णय क्र.विकास २०२४ प्र.क्र.२४९/योजना ६ याद्वारे अहिल्यानगर जिल्ह्यातील पारनेर, नगर, नेवासा व श्रीगोंदा या तालुक्यातील विकास कामासाठी एकूण ६ कोटी ९५ लक्ष रकमेच्या ४५ कामास प्रशासकीय मान्यता देण्यात येणे, मात्र ४ एप्रिल २०२५ रोजी ग्रामविकास विभागाने सार्वजनिक बांधकाम विभागाला सदर शासन निर्णय बनावट असल्याचे व संबंधित विरोधात गुन्हा दाखल करण्याचे पत्र पाठविणे, सार्वजनिक बांधकाम विभागाने या सहा महिन्यात संबंधित शासन निर्णय खरा आहे की खोटा याची खात्री न करता निविदा प्रक्रिया राबवून सदर कामांना कार्यारंभ आदेश देऊन कामे सुरू करणे, या बनावट आदेशातील ४५ कामांपैकी २.५५ कोटींची १८ कामे पूर्ण झालेली असणे, २०.४९ लाख खर्चाची सात कामे

२५ ते ३० टक्के पर्यंत झालेली असणे, मात्र सार्वजनिक बांधकाम विभागाने कोणतीही माहिती न घेता सदरच्या कामांना मान्यता देणे, याबाबत सहा महिन्यानंतर सार्वजनिक बांधकामा विभागाकडून ठेकेदारावर गुन्हा नोंदवण्यात येणे, अशाप्रकारे ठेकेदारांनी व अधिकाऱ्यांनी शासनाची केलेली लूट व फसवणूक, प्रशासनात विशेषत: मंत्रालयात लोकप्रतिनिधी पेक्षा ठेकेदारांचे वर्चस्व वाढत असल्याचे जनमानसात निर्माण झालेले मत, याबाबत शासनाने तातडीने चौकशी करून संबंधित दोषी असणाऱ्यांच्या विरोधात करावयाची कारवाई व प्रतिक्रिया."

**(६) श्री.रविशेठ पाटील, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मदत व पुनर्वसन मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"रायगड जिल्हयातील पेण तालुक्यात अवकाळी पावसाने खारेपाट येथील भात शेतीचे मोठया प्रमाणात नुकसान झालेले असल्याची बाब माहे जुन, २०२५ च्या दरम्यान निदर्शनास येणे, सदर नुकसानीचे पंचनामे अद्याप झालेले नसणे, त्यामुळे खारेपाट व दादर गावातील शेतकरी आर्थिक संकटात सापडलेला असणे व त्यांच्यामध्ये प्रचंड रोष निर्माण होणे, सदर अवकाळी पावसाने नुकसान झालेल्या खारेपाट व दादर गावातील शेतक-यांच्या शेतीचे पंचनामे करुन शेतक-यांना तातडीने नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(७) श्री.सुभाष देशमुख, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मदत व पुनर्वसन मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"सोलापूर जिल्ह्यातील फताटेवाडी येथील एनटीसीपी औष्णिक उर्जेच्या प्रकल्पासाठी जमीन दिलेल्या शेतकरी कुटुंबातील श्री. मिथुन धनु राठोड (वय वर्षे ४०) या तरुण शेतकऱ्याने नुकतीच आत्महत्या केली असणे, या प्रकल्पात गेलेल्या जमीनीस वाढीव मोबदला मिळण्यास होणारा विलंब व कंत्राटी नोकरीसाठी आलेले अपयश हे आत्महत्येचे कारण असणे, त्यामुळे या शेतकरी युवकांने टोकाचे पाऊल उचलले असणे, त्यामुळे त्याचा परिणाम त्यांच्या कुटुंबावर झालेला असणे, याबाबत राठोड कुटुंबीय व ग्रामस्थांनी एनटीसीपीच्या गेटवर आंदोलन केलेले असणे, या आंदोलनाची तात्काळ दखल घेऊन मृत शेतकऱ्याच्या कुटुंबीयांना व त्यांच्या वारसांना प्रकल्पासाठी दिलेल्या जमिनीचा वाढीव मोबदला आणि कंत्राटी नोकरी देऊन त्यांचे पुनर्वसन करण्याची आवश्यकता असणे, यावर शासनाने करावयाची उपाययोजना व कार्यवाही."

**(८) ॲड. राहुल ढिकले, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (नगर विकास) यांचे लक्ष वेधतील :-**

"नाशिक महानगरपालिका कार्यक्षेत्रातील गंगापूर धरण रॉ वॉटर पंपिंग स्टेशन ते बाराबंगला जलशुध्दीकरण केंद्रापर्यंत कच्चे पाणी वाहन नेण्यासाठी १८०० मिलीलीटर व्यासाची मुख्य गुरुत्वावाहिनी टाकणे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे व संथ गतीने सुरु असणे, मनपाच्या ठरावामध्ये मक्तेदार JWIL इन्फ्रा

लिमिटेड यांनी नमूद करणे की, सदरील जिंदाल ग्रुप ची कंपनी चा भाग असून जिंदाल SAW लिमिटेड ह्या लोखंडी पाईप उत्पादकाकडून संपूर्ण पाईप पुरवठा होणार असणे,परंतु जिंदाल SAW लिमिटेड ह्या लोखंडी पाईप उत्पादकाकडून संपूर्ण पाईप न घेता मनपा मधील तात्कालीन अधीक्षक अभियंता, EXECUTIVE ENGINEER -२ वॉटर सप्लाय DIVISION नाशिक महानगर पालिका यांनी M/s Arcelor मित्तल Nipppon Hazira या कंपनीकडून बेकायदेशीर व निकृष्ट पाईप ची खरेदी करून प्रमाणित करण्यात येणे, सिंहस्थ कुंभमेळा २०२७ पूर्वी सदरील योजना पूर्णत्वास जाणे अत्यंत गरजेचे असणे, तसेच मनपा सभा ठराव क्र. ८१ दिनांक ०२-०२-२०२३ व स्थायी समिती ठराव क्रमांक २१२ दिनांक २३-०२-२०२३ नुसार कोणतेही काम होत नसणे,सदरील योजनेमध्ये होत असलेल्या गैरप्रकाराची तातडीने चौकशी करून सदर ठेकेदार व संबंधित तत्कालीन अधिकारी यांच्यावर संगतमत करून शासनाची फसवणूक केल्याबद्दल फौजदारी गुन्हे दाखल करण्यात यावे व आर्थिक दंडात्मक वसुली करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

**(९) श्री. मोहन मते, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (नगर विकास) यांचे लक्ष वेधतील :-**

"नागपूर महानगरपालिका क्षेत्रात मौजे, बाबुलखेडा, खासरा क्र. ३४/५, शिट क्र. ३०, सर्वे क. ५८६८, ५८६९ प. ह. नं. ३९, वार्ड क्र. ४३, पांडे चाळ, जयभीम नगर, दरम्यान जाणाऱ्या २० फूट रुंद रस्त्यावरून अवैध धार्मिक स्थळाचे बांधकाम असणे, सदर अतिक्रमणामुळे होणा-या रहदारीमुळे तसेच धार्मिक स्थळावरील अनाधिकृत भोंग्यामुळे नागरीकांना प्रचंड त्रासाला सामोरे जावे लागणे, यानुषंगाने स्थानिकांनी नागपूर मनपा, नागपूर सुधार न्यास यांच्या कार्यालयामध्ये पत्रव्यवहार केलेला असणे, भूमि अभिलेख कार्यालयाच्या अभिलेखांनुसार ('क' प्रत) सदर जागेवर रस्ता दर्शविलेला असणे, नागपूर सुधार न्यास या प्राधिकरणाने सदर अनधिकृत धार्मिक स्थळाच्या अतिक्रमण निष्कासनाबाबत वारंवार नोटीस दिलेली असणे, परंतु स्थानिक नागरीकांच्या पाठपुराव्यानंतरही सदर अवैध अतिक्रमणांवर कोणतीही कारवाई न होणे, नागपूर सुधार न्यास / नागपूर मनपा व पोलीस आयुक्त नागपूर यांनी सदर अतिक्रमणावर तात्काळ कालबद्ध निष्कासन कारवाई करण्याबाबत शासनाची भूमिका व उपाययोजना."

**(१०) श्री. अतुल भातखळकर, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (नगर विकास) यांचे लक्ष वेधतील :-**

"मागाठाणे - गोरेगाव १२० फूट विकास नियोजन रस्ता हा विशेष प्रकल्प घोषित केला असणे, त्यामध्ये, या प्रकल्पाला विविध कारणांमुळे विलंब होत असल्याचे निदर्शनास येत असणे,तसेच, कांदिवली पूर्व येथील बाणडोंगरी डीपी रोडचे काम देखील अद्यापपर्यंत अपूर्ण असणे, त्यामध्ये, महानगरपालिकेच्या

पी/उत्तर विभागा पासून आर / दक्षिण विभागाच्या हद्दीपर्यंत रस्ता तातडीने पूर्ण विकसित करण्याची गरज असणे, परंतु, निविदा काढण्यात आलेली असतानाही अद्याप पर्यंत पुढील कार्यवाही झालेली नसणे, त्यामुळे, हे दोन्ही प्रकल्प तातडीने पूर्ण करण्याकरिता ठोस पाऊले उचलण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

**(११) श्री. अमित साटम, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (नगर विकास) यांचे लक्ष वेधतील :-**

"महाराष्ट्र नगर, मानखुर्द पश्चिम ते चिता कँम्प ट्राँम्बे या परिसरात नाला रुंदीकरण झालेले असणे, या नाला रुंदीकरण प्रक्रियेदरम्यान निर्वासित होणाऱ्या ११७९ पात्र झोपडपट्टी धारकांची पुनर्वसन योजना राबविलेली असणे, यापैकी ४४१ बोगस झोपडपट्टी धारकांना पात्र केल्याची तक्रार असणे,बोगस पात्र केलेल्या झोपडपट्टी धारकांपैकी किमान २०० झोपडपट्टी धारक असे आहेत की जे पुनर्वसन क्षेत्रात राहण्यास नसणे, परंतु बनावट आधार कार्ड, पॅन कार्ड, निवडणूक ओळखपत्र, लाईटबिल तयार करुन लाभ घेतलेला असणे, बोगस लाभार्थ्यांपैकी किमान ४० लाभार्थ्यांनी बनावट फोटो पास वापरलेले असणे, एका झोपडीस दोन वेळा वेगवेगळा सर्वेक्षण नंबर देऊन एकाच कुटुंबात दोन वेळा लाभ दिलेला असणे, पुनर्वसन क्षेत्रात झोपडी नसणाऱ्या स्थानिक राजकारण्यांच्या एकाच कुटुंबातील ७-८ व्यक्तींना लाभ मिळालेला असणे, एकाच व्यक्तीस २ वेळा लाभ दिलेला असणे, उप जिल्हाधिकारी (अति./निष्का.) या कार्यालयाचे बनावट लेटरहेड, शिक्के, सह्या वापरुन बोगस पात्रता मिळवलेली असणे,सदर बनावट कागदपत्रे तयार करुन मान्यता देण्यात महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांचाही सहभाग असणे. महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांकडून हेतुपरस्पर कागदपत्रांची सत्यता न तपासता अपात्र लाभार्थ्यांना पात्र करणे एका बोगस लाभार्थ्यास लाभ मिळवून देण्यासाठी महानगरपालिकेचे अधिकारी हे किमान ३० लाख रुपये प्रत्येकी घेत असणे, या प्रकरणाबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(१२) श्री. संग्राम जगताप, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे शालेय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"नाशिक जिल्ह्यातील मालेगाव येथे अन्जुमन-ए-तालीम संचलित उर्दू प्राथमिक, माध्यमिक, उच्चमाध्यमिक शाळा, स्टूडंन्टस वेल्फेअर एज्युकेशन सोसायटी संचलित स्वेस हायस्कुल, अन्जुमन-मोईनुत-तुलबा संचलित मालेगाव हायस्कुल, ज्यु. कॉलेज, सिटीजन वेल्फेअर एज्युकेशन सोसायटी संचलित सरदार प्रायमरी स्कुल या शिक्षण संस्था कार्यरत असणे, नाविद अख्तर व्यक्तीद्वारे तत्कालीन शिक्षक उपसंचालक, शिक्षणाधिकारी, अधिक्षक, जिल्हा परिषद, नाशिक यांच्याशी संगनमत करुन बनावट कागदपत्रे तयार केलेले असणे, सदर बनावट कागदपत्राद्वारे नवीन तुकड्यांची मान्यता मिळवली असणे, तसेच कर्मचाऱ्यांची मागील तारखेची नेमणुक दाखवून ज्यांनी शाळेत मागील

कोणत्याही तारखेस शाळेत सेवाच दिलेली नाही अशा शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी भर्ती दाखवुन शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन शासनाकडुन प्राप्त करुन घेतलले असणे, सदर बेकायदेशीर कामामध्ये संबंधित शाळांचे प्राचार्य, मुख्याध्यापक तसेच लिपीक देखील सहभागी असणे, यामध्ये शासनाची आजतागायत १०० कोटीपेक्षा जास्त निधीची लूट झालेली असणे, त्यानुषंगाने सिटीजन वेल्फेअर एज्युकेशन सोसायटी संचलित सरदार प्रायमरी स्कुल च्या संस्थाचालकांच्या विरोधात पोलीस स्टेशन नाशिक ग्रामीण येथे दि. १०-०६-२०२५ तक्रार क्र. ००८७/२०२५ दाखल झालेली असणे. संबंधित विषयात आर्थिक गुन्हेशाखा यांच्यामार्फत तपास, तसेच विशेष चौकशी पथक (एस.आय.टी.) स्थापन होणे आवश्यक असणे, शासकीय अधिकारी व कर्मचारी यांच्यावर विभागीय चौकशी होऊन कारवाई होणेबाबत शासनाची भुमिका व आवश्यक उपाययोजना."

**(१३) श्री. राजेश क्षिरसागर, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उद्योग मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"राज्यातील कोल्हापूरला उद्यमशीलतेचा मोठा वारसा असून, पश्चिम महाराष्ट्रातील सर्वात प्रगत शहर दळणवळणाच्या दृष्टीने सोईस्कर शहर अशी कोल्हापूर जिल्ह्याची ओळख असणे, कृषी-औद्योगिक क्षेत्रात कोल्हापूर जिल्हा अग्रेसर असुन, दरडोई उत्पन्नामध्ये कोल्हापूर देशात अव्वल स्थानी असणे, रेल्वे, रस्ते आणि हवाई वाहतुकीच्या दृष्टीनेही जिल्हा प्रगतशिल असुनही अद्याप जिल्ह्यात आंतरराष्ट्रीय दर्जाचे आयटी पार्क तयार झालेले नसणे, परिणामी जिल्ह्यातील गुणवंत अभियंता आणि तरुणांना, पुणे-मुंबई, बेंगलोर, हैद्राबाद अशा ठिकाणी नोकरीसाठी जावे लागत असणे, कोल्हापूर जिल्ह्यातील सुमारे दोन लाख तरुण-तरुणी आयटी क्षेत्रात संपूर्ण देशभरात काम करत असून, जर कोल्हापूरात सुसज्ज अत्याधुनिक आयटी पार्क हबची निर्मिती झाली तर स्थानिक औद्योगिकरणाला आणि अर्थकारणाला मोठी गती मिळणार असणे, यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींकडून कोल्हापूर जिल्ह्यात आयटी पार्क हबची निर्मिती करण्यासाठी मा. केंद्रीय मंत्र्यांकडे निवेदन करण्यात आलेले असणे, तरी स्थानिक तरुणांना स्थानिक पातळीवर रोजगाराच्या संधी मिळण्यासाठी व विविध बहुराष्ट्रीय कंपन्या कोल्हापुरात याव्यात आणि त्यातुन कोल्हापूरच्या अर्थकारणाला गती मिळावी यासाठी वारंवार पाठपुरावा करण्यात येणे, याबाबत शासनाने तातडीने केलेली वा करावयाची कार्यवाही आणि शासनाची प्रतिक्रिया."

**(१४) श्री. राजेश मोरे, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उद्योग मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"डोंबिवली MIDC क्षेत्रातील धोकादायक इमारतींच्या पुनर्विकासाबाबत तातडीच्या उपाययोजनांची आवश्यकता असणे, एम.आय.डी.सी. निवासी विभागातील इमारती ह्या ३५ ते ४० वर्षापूर्वी बांधलेल्या असल्या कारणाने त्या

आता धोकादायक आणि जीर्णावस्थेत आलेले असणे, तरी सुद्धा त्या ठिकाणी अनेक कुटुंबे नाईलाजास्तव वास्तव्यास असणे, डोंबिवलीतील MIDC औद्योगिक क्षेत्रात अनेक जुने आणि जीर्णावस्थेत गेलेले निवासी इमारतींचे संख्यात्मक प्रमाण वाढत असणे, पावसाळयाच्या पार्श्वभूमीवर या इमारतींचा कोणत्याही क्षणी भाग कोसळण्याचा धोका निर्माण झाला असणे, यामुळे रहिवाशांचे प्राण धोक्यात आले असून तात्काळ हस्तक्षेप आवश्यक असणे, यामध्ये मुख्य अडथळा म्हणजे MIDC चे टाऊन प्लॅनिंगचे नियम आणि शासनाचे (महानगरपालिका/UDD) नियम वेगळे असल्यामुळे अडथळा निर्माण होणे, पुनर्विकासाच्या प्रस्तावांना मंजुरी मिळण्यास अनेक अडथळे येत असणे, परिणामी पुनर्विकासाची कामे रखडली असून कोणतीही दुर्घटना होण्यापूर्वीच ठोस निर्णय घेणे अत्यावश्यक असणे, त्यामुळे MIDC व महानगरपालिकेच्या संयुक्त विद्यमाने धोकादायक इमारतींची तातडीने पाहणी करणे, या इमारतींच्या पुनर्विकासासाठी धोरणात्मक निर्णय घेणे, आर्थिक व प्रशासकीय मान्यता देणे, रहिवाशांना शासनाच्या पुनर्विकास धोरणांतर्गत सर्वतोपरी मदत देणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रीया."

**(१५) सर्वश्री. सुधीर मुनगंटीवार, अनंत (बाळा) नर, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे दुग्धव्यवसाय विकास मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"आरे दुग्ध वसाहत ही मुंबईच्या गोरेगाव (पूर्व) या भागात स्थित असणे, महाराष्ट्र राज्याच्या दुग्ध विकास विभागाकडून सन १९४९-१९५० साली सदर वसाहतीची स्थापना करणे, मुंबई शहराला आवश्यक दुध पुरवठा, किफायतशीर दरात उपलब्ध व्हावा म्हणून सदर वसाहतीची निर्मिती केलेली असणे, सदर वसाहतीचे क्षेत्रफळ साधारणत: ३१६० एकर असणे, दुग्धविकास विभागाचे नियंत्रणाखाली मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडून सदर वसाहतीचे व्यवस्थापन तसेच प्रशासन चालविले जात असणे, दुग्ध पुरवठा तसेच पर्यावरण संतुलन यासाठी सदर वसाहतीची ओळख असणे, परंतु या वसाहतीमध्ये झालेली व सुरु असलेली अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणे, तसेच नियमबाह्यरित्या जागेचा वापर, सुरु असलेले अवैध धंदे व संघटीत गुन्हेगारीकृत्ये इत्यादींबाबत परिसरातील नागरिक, सामाजिक कार्यकर्ते, पर्यावरणप्रेमी तसेच विविध संघटना यांच्याकडून वसाहतीचे मुख्य कार्यकारी अधिकारी, पोलीस प्रशासन तसेच शासनाचे विविध संबंधित विभाग यांच्याकडे वारंवार तक्रारी करत असणे, तरीही संबंधित विभागाचे अधिकारी यांच्याकडून कोणतीही ठोस कार्यवाही न करणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

**(१६) सर्वश्री. राजेश पाडवी, रामदास मसराम, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आदिवासी विकास मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"छत्रपती संभाजीनगर येथील लक्ष्मण तुकाराम कनले यांनी अवैधरित्या अनु. जमाती मधील "मन्नेरवारलू" जमातीचे जातवैधता प्रमाणपत्र प्राप्त करून आजपावेतो २८ वर्ष नोकरी करीत असणे, याच व्यक्तीच्या रक्त नात्यातील यांची पुतणी शिवानी तात्याराव कनले यांच्या जातवैधता प्रकरणात खुल्या प्रवर्गातील "मराठा" जात असलेले लक्ष्मण कनले यांनी शासनाची व न्यायालयाची फसवणूक केल्याची बाब औरंगाबाद जात पडताळणी समिती पुढे आल्याने तत्कालीन सहआयुक्त यांनी दि. ०६/१०/२०२० रोजी लक्ष्मण कनले यांना कारणे दाखवा नोटीस बजावली असणे, सहआयुक्त संगीता चव्हाण यांनी दक्षता पथकाच्या गृह चौकशीत लक्ष्मण कनले यांच्या "मराठा" या मुळ जातीचे पुरावे समितीच्या रेकार्डवर असतांनाही दुर्लक्ष करून दि. ०१/०२/२०२३ रोजी चुकीच्या पद्धतीने लक्ष्मण कनले यांची नोटीस रद्द करून अक्षम्य चूक केलेली असणे, याचाच फायदा घेऊन ३८ लोक "मन्नेरवारलु" जातवैधता आधारे नोकरीत अनु. जमातीच्या आरक्षणाचा लाभ घेत असणे,त्यामुळे संगीता चव्हाण यांनी सहआयुक्त पदाचा गैरवापरामुळे मा. उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ औरंगाबाद, सिविल अप्लिकेशन ४७४८/२०२३, रिट याचिका ३२२४/२०२३, दि. ०६/०४/२०२३ रोजीच्या निर्णयात संगीता चव्हाण यांना दंड ठोठावण्याबाबत आदेश निर्गमित केले असणे, पण यावर अजूनही कोणतीही कार्यवाही झालेली नसणे, त्यामुळे बोगस जात वैधता प्रमाणपत्र देणे थांबविण्यासाठी व सहआयुक्त यांच्यावर कारवाई करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(१७) श्री. नरेंद्र भोंडेकर, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सामाजिक न्याय मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"एन.बी.बी. मागासवर्गीय सहकारी संस्था मर्यादित भंडारा, या नोंदणीकृत संस्थेला कातडी कामविणे या प्रकल्पाकरीता रुपये ६९४ लक्ष इतके कर्ज मंजूर झाले असणे, शासनाकडून ७०% रक्कम संस्थेला दिली असणे, शासनाकडून प्राप्त ७०% रकमेतून प्रकल्प उभारणी व आवश्यक मशिनरीची खरेदी केली असणे, संस्थेला प्राप्त रकमेचे पहिल्या व दुसऱ्या व अंतीम हफ्त्याचे उपयोगीता प्रमाणपत्र जिल्हाधिकारी भंडारा यांनी सादर केले असणे, संस्थेने १०/१२/२०१३ ते १८/१२/२०१४ या कालावधीमध्ये सर्व यंत्र फिटींग करुन प्रकल्प सुरु केला असणे, प्रकल्प २०१८ पर्यंत सुरळीत चालू असणे, महाराष्ट्र राज्याचे अधिनियम दिनांक ४ मार्च २०१५ अन्वये प्राणी सरंक्षण या कायद्यानुसार राज्यात गायीची व बैलाची कत्तल करणे यावर बंदी आणली असल्याने प्रकल्पाकरीता लागणाऱ्या कच्च्या मालाचा तुटवडा बाजारात निर्माण होणे, कच्च्या मालाअभावी वित्तीय संस्थेकडून प्रकल्पाचे शिल्लक २५% कर्जाची रक्कम अप्राप्त असणे, सबब व्यवसाय चालविणे आर्थीकदृष्टीने

परवडण्यासारखे नसल्याने सदर प्रकल्प संस्थेमार्फत बंद करण्यात आला असणे, परिणामी कर्जाची परतफेड करणे शक्य नसणे, संस्थेकडून कर्जमाफीची मागणी करण्यात आली असणे, शासनाच्या अधिनियमानुसार या प्रकल्पावर गदा आली असणे, पर्यायाने कर्जमाफी होणे आवश्यक असणे, यावर शासनाने केलीली उपाययोजना तसेच करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**( सकाळी ११.०० वाजता )**

**एक : प्रश्नोत्तरे**

**दोन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे -**

**(१) उप मुख्यमंत्री तथा वित्त मंत्री** : "भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचे (१) ३१ मार्च, २०२२ रोजी संपलेल्या वर्षाचा अनुपालन अहवाल (२) ३१ मार्च, २०२२ रोजी संपलेल्या वर्षाचा स्थानिक संस्थावरील वार्षिक तांत्रिक निरीक्षण अहवाल (३) सन २०२३-२०२४ या वर्षाचा राज्य वित्त व्यवस्थेवरील अहवाल (४) मार्च, २०२२ रोजी संपलेल्या वर्षाचा अनुपालन लेखापरीक्षा अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(२) दिव्यांग कल्याण मंत्री** : महाराष्ट्र राज्य दिव्यांग वित्त व विकास महामंडळ मर्यादित यांचा सन २०१५-२०१६ ते सन २०१८-२०१९ या वर्षांचे वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(३) ग्रामविकास व पंचायत राज मंत्री** : महाराष्ट्रातील जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांचे सन २०१५-२०१६ ते सन २०१८-२०१९ चे वार्षिक एकत्रित वित्तीय व महसुली लेखे सभागृहासमोर ठेवतील.

**तीन : महिला व बालकांचे हक्क आणि कल्याण समितीचा पहिला अहवाल सादर करणे.**

**चार : विधानसभा सदस्य अनुपस्थिती समितीचा (२०२४-२०२५) पहिला अहवाल सादर करणे व त्यावर विचार करणे.**

**पाच : विधानसभेने संमत केलेल्या विधेयकांना विधानपरिषदेची संमती व दोन्ही सभागृहांनी संमत केलेल्या विधेयकांना राष्ट्रपती / राज्यपालांची अधिसंमती मिळाल्याचे जाहीर करणे.**

**सहा : मा.समिती प्रमुख, विधानसभा विशेषाधिकार समिती यांचा प्रस्ताव -**

विधानसभा विशेषाधिकार समितीकडे विचारार्थ प्रलंबित असलेल्या,

(१) श्री. जयकुमार गोरे, मा. ग्रामविकास मंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी श्री. रोहित पवार, वि.स.स. यांचेविरुध्द दिनांक ५ मार्च, २०२५ रोजी उपस्थित केलेले विशेषाधिकारभंग व अवमानाचे प्रकरण.

(२) श्री. जयकुमार गोरे, मा. ग्रामविकास मंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी "लय भारी" युटयुब वाहिनीचे संपादक / चालक श्री. तात्यासो ऊर्फ तुषार आबाजी खरात यांचेविरुध्द दिनांक ५ मार्च, २०२५ रोजी उपस्थित केलेले विशेषाधिकारभंग व अवमानाचे प्रकरण.

(३) श्री. जयकुमार गोरे, मा. ग्रामविकास मंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी श्री. संजय राऊत, राज्यसभा सदस्य व कार्यकारी संपादक, "सामना" वृत्तपत्र यांचेविरुध्द दिनांक ५ मार्च, २०२५ रोजी उपस्थित केलेले विशेषाधिकारभंग व अवमानाचे प्रकरण.

या तीन प्रकरणांवरील विशेषाधिकार समितीचे अहवाल सादर करण्याकरिता महाराष्ट्र विधानसभा नियम १८३(१) च्या परंतुकान्वये पुढील अधिवेशनाच्या शेवटच्या दिवसापर्यंत मुदत वाढवून देण्यात यावी.

**सात : विनंती अर्ज सादर करणे -**

**(१) श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स.** : "मे.ऑरोबिंडो ॲन्ड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. कंपनी प्रशासनाद्वारे टाकळी-जेना-बेलोरा नार्थ ॲन्ड टाकळी - जेना - बेलोरा साऊथ खुली व भुमीगत कोळसा खाण प्रकल्पबाधीत शेतकऱ्यांच्या, ग्रामपंचायतीच्या मागण्यांची पूर्तता करण्याबाबत." या विषयावरील विनंती अर्ज सभागृहाला सादर करतील.

**(२) श्री.अतुल भातखळकर, वि.स.स.** : "कांदिवली / मालाड पूर्व येथील सेंट्रल ऑर्डनन्स डेपो (COD) परिसरातील पुनर्विकास प्रकल्पांना येणाऱ्या कायदेशीर अडथळ्यांचे निराकरण आणि संरक्षण मंत्रालयाच्या २०१६ च्या मार्गदर्शक तत्वांशी सुसंगतपणे पालन करण्याची सुनिश्चितता करण्याबाबत." या विषयावरील विनंती अर्ज सभागृहाला सादर करतील.

**आठ : स्थगन प्रस्तावाच्या सूचना - (असल्यास) (म.वि.स. नियम ९७ अन्वये)**

**नऊ : औचित्याचे मुद्दे**

**दहा : (अ) लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :-**

**(१) सर्वश्री. कैलास घाडगे पाटील, उमेश यावलकर, अमित विलासराव देशमुख, विकास ठाकरे, संजय मेश्राम, मनोज जामसुतकर, सुरेश धस, सुनिल प्रभू, शरद सोनावणे, दिलीप लांडे, अभिजीत पाटील, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"धाराशिवसह राज्यातील ग्रामीण भागात ऑनलाईन गेमिंगचे प्रकार वाढलेले असणे, या ऑनलाईन गेममध्ये तरुणांना आमिष मिळाल्याने तरुण आहारी जाणे, या गेममध्ये तरुणांची फसवणूक होणे, यामुळे तरुणांचे कर्जबाजारी होणे, बेरोजगार होणे, परिणामी त्यांचे आयुष्य पणाला लागलेले असणे, धाराशिव जिल्ह्यातील बावी येथील तरुणाने पत्नी व बाळासह आत्महत्या करणे, तर यामुळे कारी येथील तरुणांची ७० लाखांची फसवणूक होणे, परिणामी नैराश्य येणे, ऑनलाईन गेमिंगमध्ये आमिषाच्या नावाखाली तरुणांच्या मूत्यू चे प्रमाण वाढणे, त्यामुळे सायबर कायदा करून रमी सर्कल सारख्या आमिष दाखवणाऱ्या गेमवर बंदी घालून फसवणुकीचे प्रकार थांबविण्यासाठी शासनाने तातडीची करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

**(२) सर्वश्री. विक्रम पाचपुते, रोहित पवार, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"अहिल्यानगर जिल्हयामध्ये १४ तालुके असुन एकुण ३७ पोलीस स्टेशन असणे, अहिल्यानगर जिल्हा पोलीस दलामध्ये ३८ पोलीस निरीक्षक, ४७ सहायक पोलीस निरीक्षक, ९२ पोलीस उपनिरीक्षक असे एकुण १७७ अधिकारी व सहाय्यक फौजदार, पोलीस हेड कॉन्टेबल व पोलीस कॉन्टेबल असे एकुण ३०४१ अंमलदार कार्यरत असणे, सन २०२२ मध्ये एकूण २८,२५१, सन २०२३ मध्ये एकूण ३३,९६१, सन २०२४ मध्ये एकूण ३४,२६४, सन २०२५ मध्ये एकूण १६,४९३ इतकी दाखल गुन्हे असल्याची माहिती प्राप्त होणे, अहिल्यानगर जिल्हयामध्ये कायदा व सुव्यवस्था आबाधित राखण्यासाठी जिल्हा पोलीस दलामध्ये असलेले संख्याबळ पुरेशे नसल्याची बाब समजणे, घडणारे गुन्हे व अप्रिय घटना पाहता संख्याबळ वाढविण्याची आवशक्यता, अहिल्यानगर जिल्हा क्षेत्रफळाने मोठा असून जिल्हयाची वाढती लोकसंख्या व गुन्हेगारी पाहता नविन पोलीस स्टेशनची निर्मिती करण्याची नितांत आवश्यकता, त्याचबरोबर सर्व पोलीस स्टेशनला अपुरे संख्याबळ असल्याने पोलीस स्टेशनला संख्याबळ वाढविल्यास जिल्हयातील गुन्हेगारीवर वचक निर्माण करण्यास मदत होणार असल्याने शासनाने करावयाची कार्यवाही व भूमिका."

**(३) सर्वश्री. विनोद अग्रवाल, संजय पुराम, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"गोंदिया जिल्ह्यातील बिरसी विमानतळाचे विस्तारीकरणाकरीता सन २००९-१० मध्ये बिरसी गावातील अधिग्रहीत करण्यात आलेल्या १०६ घरांचा सन २०१३ प्रमाणे मंजुर करण्यात आलेल्या रु.५.०० लक्षच्या मोबदल्यामध्ये वाढ करुन रु.१०.०० लक्षची मागणी असणे, कामठा-परसवाडा प्रमुख जिल्हा मार्ग बाधीत झाल्याने १० किलोमिटरचा फेरामुळे नागरिकांना-विद्यार्थ्यांना नाहक त्रास होणे, बिरसी विमानतळ विस्तारीकरणामुळे कामठा-बिरसी-खातीया राज्य महामार्गाचे बांधकामामुळे बिरसी गावातील सुविधा बाधीत होणे, दिनांक ०८/०४/२०२५ रोजी अपर मुख्य सचिव, विमानचालन, सामान्य प्रशासन विभाग, यांचे बैठकीमध्ये १०६ प्रकल्पग्रस्तांचे अनुदानामध्ये वाढ तथा ८ प्रकल्पग्रस्तांचा समावेश करणे, कामठा-परसवाडा प्रमुख जिल्हामार्गाचे बांधकामाच्या अनुषंगाने कार्यवाही करणे, रावणवाडी-खातीया-कामठा राज्यमहामार्गाच्या बांधकाम अलायमेंटमध्ये दुरूस्तीसह नविन प्रस्ताव तयार करणे, नविन अंदाजीत ९० घरांचे संपादनास मोबदला देण्याबाबत महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मार्फत सविस्तर प्रस्ताव शासनाला सादर करण्याचा निर्णय घेण्यात येणे, तथापि याबाबत मागील दोन महिन्यांमध्ये कोणत्याही कार्यवाही करण्यात आलेली नसणे, विमानचालन सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय यांनी उक्त सोई-सुविधा भारतीय विमानपत्तन प्राधिकरण यांनी करावे असे महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी, मुंबई यांना दिनांक २५/०४/२०२५ रोजीच्या पत्रान्वये कळविणे, बिरसी प्रकल्पग्रस्त क्षेत्रातील सुविधाकरीता राज्य शासन व महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी एकमेकांवर जबाबदारी निश्चित करणे, प्रकल्पग्रस्त क्षेत्रातील नागरिक मुलभूत सुविधांपासून वंचित असल्याने नागरिकांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण, यावर शासनाने तातडीची करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(४) श्री. हरिश्चंद्र भोये, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"विक्रमगड तालुक्यातील (जि.पालघर) देहेर्जे प्रकल्पात विक्रमगड व जव्हार तालुक्यातील खुडेद, साखरा, भडांगेपाडा, उंबरवागणं, तिवसपाडा, संगमनेर, महालेपाडा इत्यादी अनेक गाव पाड्यातील १७९ कुटुंबे प्रकल्पबाधित झालेली असणे, उक्त प्रकल्पाचे काम अंतिम टप्प्यात असून प्रकल्पग्रस्तांना सन २०१९ पासून अद्यापही घरे व शेतीचा मोबदला मिळालेला नसणे, तसेच त्यांचे पुनर्वसन करण्यात आलेले नसणे, परिणामी प्रकल्पबाधित कुटुंबियांमध्ये वाढते नैराश्याचे व तीव्र असंतोषाचे वातावरण, सदर प्रकल्पग्रस्तांचे तातडीने पुनर्वन करावे, शेती व घरांचा मोबदला देण्यात यावा तसेच या प्रकल्पातून परिसरातील पाणी टंचाईग्रस्त लोकांना अगोदर घरे व शेती इत्यादी विविध मागण्या करण्यात येणे, उक्त प्रकल्पातील

प्रकल्पग्रस्तांचे तातडीने पुनर्वसन करण्याच्या तसेच घरे व शेतीचा मोबदला तातडीने देण्याच्या अनुषंगाने निर्णयात्मक कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली कार्यवाही वा शासनाची प्रतिक्रिया."

**(५) श्री.अर्जुन खोतकर, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"जालना जिल्ह्यात समृद्धी महामार्गाचे काम मोठ्या प्रमाणात सुरु असून या प्रकल्पासाठी हजारो शेतकऱ्यांची उपजीविकेची साधने असलेली शेती सरकारने संपादित करण्याची अधिसूचना काढली असणे, सदर अधिसूचनेस ३ वर्षे उलटूनही भूसंपादन प्रक्रिया अंतिम न होणे, जिल्हाधिकारी यांच्याकडून कार्यवाहीत विलंब होत असून प्रकल्पबाधित शेतकऱ्यांना वेठीस धरत असणे, अद्याप जमिनी मोजणीच्या पलीकडे प्रक्रिया पुढे न सरकणे, त्यातच एकरी दीड कोटींचे बाजारमूल्य असताना २०-२५ लाखांची मूल्यांकने काढून बाधित शेतकऱ्यांना देशोधडीला लावण्याचा प्रयत्न करणे, खरंतर ज्यावेळेस जमीन खरेदी करायची त्यावेळचे भाव लागू होणे अपेक्षित असणे, परंतु शासनाने या जमिनींना पूर्वीचेच भाव लागू केले असणे, परिणामी शेतकऱ्यांमध्ये शासनाप्रति निर्माण झालेली चीड व असंतोषाची भावना, या गंभीर प्रश्नाकडे शासनकर्त्यांनी लक्ष देऊन प्रत्यक्ष पाहणी करून शासकीय दर आणि सर्वाधिक बाजार मूल्य याचा तुलनात्मक अभ्यास करून जो जास्त दर निघेल त्याचा संदर्भ घेऊन मूल्यांकन ठरवण्याची आवश्यकता, याबाबत बाधित शेतकऱ्यांचा प्रश्न कायमस्वरूपी निकाली काढण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**(६) सर्वश्री. किशोर जोरगेवार, प्रविण दटके, प्रताप अडसड, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"चंद्रपूर जिल्ह्यातील चंद्रपूर महानगरपालिका व घुग्गुस नगरपरिषद हद्दीतील अनेक नागरिक वर्षानुवर्षे नझुल जमिनीवर घरे बांधून वास्तव्यास असणे, चंद्रपूर शहरातील ३९ झोपडपट्ट्यांमध्ये सुमारे ११,८८१ कुटुंबे राहत असून, केवळ १४ झोपडपट्ट्यांचे सर्वेक्षण झालेले असून उर्वरित २५ झोपडपट्ट्यांचे अद्यापही सर्वेक्षण झालेले नसणे, तसेच घुग्गुस नगरपरिषद हद्दीतील सर्व्हे क्र.२९/१, २६३, २६४, २६५, २६६, ३१७, ३१८ या शासकीय जमिनीवर गेल्या ३० वर्षापासून अनेक कुटुंबिय वास्तव्य करीत असणे, उक्त रहिवाश्यांकडून शासनाचा कर भरण्यात येत असतांनाही सुमारे १३०० कुटुंबियांना स्थानिक प्रशासनाकडून अतिक्रमण नोटीसा बजावण्यात येणे,त्यामुळे त्यांच्यावर बेघर होण्याची आलेली वेळ, उक्त नझुल जमिनीवरील भोगवटाधारक नागरीकांकडून गेल्या अनेक दशकांपासून वारंवार स्थायी पट्ट्यांची मागणी होत असणे, याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी वारंवार जिल्हाधिकारी,आयुक्त, चंद्रपूर, मुख्य कार्यकारी

अधिकारी, घुग्गुस नगरपरिषद, संबंधित तहसिलदार तसेच मा.मुख्यमंत्री, मा.महसूल मंत्री यांचेकडे मागणी केलेली असणे, तथापी अद्यापपर्यंत जिल्ह्यातील नझुल जमिनीवरील रहिवाश्यांना स्थायी पट्टे देण्यात न येणे, परिणामी सदर कुटुंबियांना नागरी सुविधा, शासकीय योजना व कर्ज सुविधेच्या लाभापासून वंचित रहावे लागणे, शासनाने उक्त प्रकरणी तातडीने निर्णयात्मक कार्यवाही करुन चंद्रपूर महानगरपालिका व घुग्गुस नगरपरिषद क्षेत्रातील नझुल जमिनीवरील घरे व त्यांचे भोगवटाधारक बेघर होण्यापासून वाचवण्यासाठी तसेच मुलभुत नागरी सोयीसुविधा व शासकीय योजनांचा लाभ मिळवा याकरीता तातडीने स्थायी पट्टे देण्याची आवश्यकता यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

**(७) सर्वश्री. अमित झनक, सुनिल प्रभू, सुधीर मुनगंटीवार, चेतन तुपे, डॉ. जितेंद्र आव्हाड, मंगेश चव्हाण, अनंत (बाळा) नर, सुनिल कांबळे, अतुल भातखळकर, देवराव भोंगळे, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"राज्यातील १० वी चा निकाल लागल्यावर १५ दिवसात होणारी प्रवेश प्रक्रिया दूर ठेवून शासनाने ऑनलाईन प्रवेशप्रक्रिया राबविणे, ही ऑनलाईन केंद्रीय प्रवेश प्रक्रिया शहरी, निमशहरी, ग्रामीण भागात अनिवार्य करण्यात येणे, मात्र नविन व्यवस्था उभी करताना शासनाने घाई करुन विद्यार्थी व पालकांना अडचणीत आणणे, या प्रवेश प्रक्रियेत सुमारे साडे तेरा लाख विद्यार्थीनी नोंदणी करणे, पैकी फक्त ५ लाख १० हजार विद्यार्थ्यांचे प्रवेश होणे, तसेच नोंदणी प्रक्रिये संदर्भात १०० रुपये शुल्क आकारले जाणे, मात्र काही ठिकाणी २०० ते ३०० रुपये वसूल केले जाणे, या शिवाय महाविद्यालयांचा पर्याय देताना विद्यार्थ्यांनी गोंधळून जाऊन चुक झाल्याने त्यांचे अनुदानित किंवा स्वयंअर्थसंहिता अशी फारकत करता न आल्याने या सर्व विद्यार्थ्यांना आर्थिक नुकसान सोसावा लागणार असणे, त्यामुळे मुंबई,पुणे,नागपूर वगळता ही प्रवेश प्रक्रिया उर्वरित ठिकाणी विद्यार्थ्यांनसाठी जटिल ठरली असणे, कोचिंग क्लास व काही महाविद्यालयांचे हित संबंध असल्याचे समोर येणे, यामुळे या प्रक्रियेतुन कला शाखा व ग्रामीण भाग वगळावा अशी मागणी होत असणे, परंतू शासन करीत असलेले दुर्लक्ष त्यामुळे शासना विरुध्द विद्यार्थी व पालकांमध्ये पसरलेला असंतोष, शासनाने याबाबत तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रीया."

**(८) सर्वश्री. सुनिल कांबळे, प्रविण दटके, प्रताप अडसड, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे वने मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"महाराष्ट्र राज्यातील वन विभागाच्या जमिनींवर मोठया प्रमाणात धार्मिक अतिक्रणे झालेले असणे, यामुळे महाराष्ट्रातीलवन क्षेत्र झपाटयाने कमी होत असणे, यामध्ये प्रामुख्याने मौजे शिरुर, जि, पुणे येथील फॉरेस्ट कंपार्टमेंट ४२१ वन गट क्र. ११४० यावनजमिनीवर शासनाची कोणतीही परवानगी न घेता अनधिकृत धार्मिक स्थळाचे बांधकाम केलेल असणे, मौजे कोंदेगाव, ता. सावनेर, जि. नागपूर येथील गाव हद्दीतील झुडपी सर्व्हे नं. ६३ व ६४ ही जमीन वन विभागाची असणे, सदर वन विभागाच्या शासकीय जमिनीवर शासनाची कोणतीही परवानगी न घेता अतिक्रमण करुन धार्मिक शैक्षणिक संस्थेचे बांधकाम केलेले असणे, सदर अतिक्रमण निष्कासन करुन संबंधितांवर कडक कारवाई करण्याची विनंती अर्ज ग्रामपंचायत कार्यालय, कोंदेगाव यांनी जिल्हाधिकारी, नागपूर, तहसिलदार व उप विभागीय अधिकारी, सावनेर, मुख्य वनसंरक्षक, नागपूर यांना दिलेला असणे, बोरामणी, ता. दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर येथील गट क़्र. ५७४, गट क्र. ७६९ हे या वनजमिनीवर दावल मलिक बाबा दर्गा तसेच काही अनाधिकृत घरे व दुकाने यांचे अतिक्रमण असणे, सदर अतिक्रमण तात्काळ निष्कासित करुन संबंधितांवर गुन्हे दाखल करणे आवश्यक असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(९) श्री. बाबुराव कदम - कोहळीकर, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे पणन मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"नांदेड जिल्ह्यातील हिमायतनगर कृषी उत्पन्न बाजार समितीत आजमितीपर्यंत शेतीमालाचा लिलाव झालेला नसणे,तसेच उक्त बाजार समितीला गाळे,मोकळे प्लॉट यांच्या लिलावातून तसेच बाजार शुल्कातून कोट्यावधी रुपये मिळत असून सदर पैशाचा होत असलेला अपव्यय, गाळांच्या लिलावात झालेला गैरव्यवहार, मार्केट यार्डातील प्लॉट लिज भाडेतत्तवावर वाटप करतांना कलम १२ (१) नुसार अटी व शर्तीचे उल्लंघन करुन कांही मर्जीतील व्यापा-यांनाच गाळे वाटप करण्यात येणे, लिज प्रिमियम रक्कमेपेक्षा कमी रक्कम घेऊन गाळयाचे वाटप करणे, बाजार समितीने पणन संचालक,पुणे यांच्या दि.२२/०९/२०१७ रोजीच्या निर्देशानुसार गाळेवाटप व नोकर भरतीत तीन टक्के आरक्षण ठेवणे अपेक्षित असतांनाही ते ठेवण्यात न येणे, बाजार समितीमध्ये १०६ गाळे लिलावासाठी मंजूर असतांना केवळ ७७ गाळांच्या लिलाव व्यापा-यांसमोर करणे, आर्थिक स्वार्थापोटी उर्वरीत २९ गाळांच्या लिलाव न करता गाळयाचे वाटप करणे, परिणामी सर्वसामान्य व्यापारी बाजार समितीच्या गाळयापासून वंचित राहणे, स्थानिक लोकप्रतिनिधींनी उक्त लिलाव प्रक्रिया रद्द करुन सदर प्रकरणाची

चौकशी करुन दोषींवर कारवाई करण्याची मा.पणनमंत्री यांचेकडे निवेदनाव्दारे केलेली मागणी, उक्त प्रकरणी चौकशी करुन शासनास अहवाल सादर करण्याचे आदेश कक्ष अधिकारी, पणन विभाग, महाराष्ट्र शासन यांनी पणन संचालक,पुणे यांना दि.२८/०४/२०२५ रोजी देणे, परंतु अद्यापही उक्त प्रकरणी कोणतीच कार्यवाही न होणे, शासनाने उक्त प्रकरणी तातडीने चौकशी करुन दोषींवर कठोर कारवाई करण्याची आवश्यकता."

**(१०) श्री. तानाजी मुटकुळे, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे अल्पसंख्यांक विकास आणि औकाफ मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"परभणी शहर महानगरपालिका परभणीच्या हद्दीतील शेत सर्वे नं. ४७/१, ४७/२, ४८, ४९, ५०, ७०, ७१/१, ७८/१, ९०, ३४० हे महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाच्या इनामी वक्फ मिळकती असणे, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाचे गॅझेट जे की, महाराष्ट्र शासन राजपत्र १८ एप्रिल १९७४ वर नोंदणीकृत आहे त्यावर उपरोक्त सर्वे नंबर हे इनामी वक्फ जमिनी असल्याचे नमुद असणे, सदर मिळकतीबाबत महसूल अधिकारी / कर्मचारी यांच्याशी संगनमत करुन व खोटे फेरफार दाखल करुन परस्पररित्या इतर लोकांच्या नावे करण्यात आली असणे, सदर इनामी जमिनी इतर लोकांच्या नावे विनापरवाना हस्तांतरित केल्यामुळे वक्फ संस्था, वक्फ मंडळ व महाराष्ट्र शासनाचे महसूली नुकसान झालेले असणे. महाराष्ट्रातील छत्रपती संभाजीनगर, बीड, नांदेड, हिंगोली, जालना, व पुणे इत्यादी जिल्ह्यात वक्फच्या अनेक मिळकती असणे, सदर जिल्ह्यातील तसेच महाराष्ट्र राज्यातील इतर जिल्ह्यातील वक्फच्या जमिनी शासनाच्या पुर्व परवानगी शिवाय हस्तांतरीत झालेल्या असणे याबाबत शासनाची भुमिका व करावयाच्या उपाययोजना."

**(११) श्री. सुनिल प्रभू, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे कृषी मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"सांगली जिल्हयातील द्राक्ष पिके, पालेभाज्या व फळ पिकांचे उत्पादक शेतकऱ्यांना पीजीआर कंपनीच्या सल्लागाराने कृषी विभागातील अधिकाऱ्यांसोबत संगनमताने बनावट औषध विक्री करुन कोटयावधी रुपयाचा अर्थिक गैरव्यवहार केल्याचा धक्कादायक प्रकार दि.०३.०७.२०२५ रोजी उघडकीस येणे, सदरहू कंपनीचे ठिकाण गल्ली बोळात पत्र्याच्या खोलीत असताना, त्यांनी दिशाभूल व फसवणूक करुन पुणे, मुंबई, ठाणे ठिकाणचा खोटा पत्ता नमूद करण्यात येणे, या कंपनीने हजारो शेतकऱ्यांना बनावट औषधाची निर्मिती, पुरवठा आणि चढ्या दराने विक्री करुन गेले दहा वर्ष ते अद्यापपर्यंत प्रंचड घोटाळा करण्यात येणे, सदरहू कंपनीचा कार्यभार कृषी अधिकारी, कंपनी चालक, सल्लागार, वितरक, कृषी सेवा केंद्र चालक, कृषी विभागातील अधिकाऱ्यांचे नातेवाईक तसेच नातेवाईकांच्या नावे बोगस कंपनीची बनावट औषध विक्री चालू असणे, कंपनीच्या सल्लागाराने

पीजीआर कंपनीचे औषधे खरेदी करण्यासाठी तयार केलेल्या यादीत कृषी विभागातील अधिकारी यांचे नाव व मोबाईल नंबर असल्याचा गंभीर प्रकार उघडकीस येणे, सदर प्रकरणाची शासनाने सखोल चौकशी करुन दोषीविरुध्द कठोर कारवाई करण्याची आवश्यकता,याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

**(१२) श्री. समाधान आवताडे, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मदत व पुनर्वसन मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"सोलापूर जिल्ह्यातील कासेगाव सहित पंढरपूर मंगळवेढा तालुक्यातील द्राक्ष बाग आणि डाळिंब बाग करणारा बागायतदार आर्थिक दृष्ट्या डबघाईला आलेला असणे, माझ्या मतदारसंघातील कासेगाव पंढरपूर व मंगळवेढा येथे ६५०० एकर द्राक्ष, ३३०० एकर डाळिंब, ४२८५ हेक्टर द्राक्ष, डाळिंब ४७७० हेक्टर व १५७८ हेक्टर द्राक्ष ३५१४ हेक्टर डाळिंब इतके फळबाग असणे परंतु प्रशासनाच्या हलगर्जीपणा आणि निसर्गामुळे येथील बागायतदार शेतकरी तब्बल ९०० कोटी रुपयांच्या कर्जासाठी डुबलेला असणे यामुळे शेतकऱ्यांच्या सिबील खराब होऊन त्यांना नवीन कर्ज मिळत नसणे सदर बागायतदार आर्थिक संकटात आल्यामुळे याचा प्रतिकूल परिणाम येथील मजुरांवर होत असुन त्यांना हक्काच्या रोजगारापासून वंचित राहावे लागत असणे यामुळे येथील फळबागायतदार शेतकरी यात विशेषता डाळिंब व द्राक्ष ही फळे पिकवणाऱ्या शेतकऱ्यांमध्ये प्रशासनाविषयी व शासनाविषयी असंतोषाची भावना निर्माण होणे याकरता शासनाने तात्काळ सदर बागात दरांचे कर्ज माफ करून त्यांना आर्थिक दृष्ट्या स्थिरस्थावर होण्यासाठी नवीन आवश्यक कर्ज मंजूर करणेबाबत करावयाची कारवाई व उपाययोजना."

**(१३) श्री. शंकर जगताप, श्रीमती मंदा म्हात्रे, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे कामगार मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"राज्यातील पत्रकारांच्या सामाजिक आर्थिक, व्यावसायिक हितासाठी लोकशाहीच्या चौथ्या स्तंभाला बळकटी देण्याकरिता, इलेक्ट्रॉनिक डिजिटल आकाशवाणी इ.प्रसार माध्यमातून कार्यरत असलेल्या पूर्ण वेळ, अर्धवेळ, श्रमिक, अंशकालीन पत्रकारांची त्यांच्या अनुभव अनुरूप पत्रकारांसाठीचे शासन निर्णय, सन्मान योजना सुधारणा करून सर्वसमावेशक धोरण तयार करून पत्रकारांच्या कामगारांच्या कामाचे आर्थिक, आरोग्याच्या सुरक्षिततेबाबत करारनामा योग्यप्रकारे होईल याची पडताळणी करण्याकरिता मालक, पत्रकार, कामगार, सरकार यांची त्रिसदस्य समिती पत्रकार महामंडळांतर्गत स्थापन करून, कायम/कंत्राटी पत्रकार,पत्रकारत्तर कर्मचारी वर्ग यांना काम, किमान वेतन, आरोग्य आदी सुरक्षा देणे, श्रमिक पत्रकार व पत्रकार कर्मचाऱ्यांचे रजिस्ट्रेशन हिताचे धोरण आखणी करण्याबरोबरच पत्रकारांचे प्रशिक्षण, संशोधन उपक्रम कार्यान्वित करून पत्रकारांना पुरस्कार

प्रोत्साहन उपक्रम, स्पर्धांचे आयोजन करणे, माध्यमांकरीता नियमावली तयार करून केंद्र, राज्य सरकारच्या सुविधा गाव पातळीवरील माध्यम कर्मचाऱ्यापर्यंत पोहोचवणे, पत्रकार क्षेत्रातील घुसेखोरी आराजकता रोखून चुकीच्या कृतीवर वेळीच आळा घालणे शक्य होण्याकरिता देशात पत्रकारांसाठी कल्याणकारी महामंडळाची गठन करण्याची घोषणा करण्यात येऊनही महामंडळ गठीत न होणे, राज्यातील अभ्यासू स्त्री-पुरुष पत्रकार कामगार, माहिती जनसंपर्क विभागातील कार्यक्षम अधिकारी यांचा समावेश करून मीडिया असोसिएशन ऑफ इंडिया व राज्यातील इतर पत्रकार संघटनेची मागणी लक्षात घेता पत्रकार कल्याणकारी महामंडळाची अंमलबजावणी करून त्याचे कार्यालय, अधिकारी, निधी यांची निश्चिती करून पत्रकारांसाठी आरोग्य विमा निवृत्तीवेतन अपघात विमा, निवासी सुविधा, शिष्यवृत्ती योजना प्रभावीपणे लागू करून जिल्हा, तालुका पातळीवर पत्रकारांना सुविधा पुरविण्याचे केंद्र स्थापन करण्यासाठी महाराष्ट्रात पत्रकारांचे हित जोपासण्यासाठी आचार्य बाळशास्त्री जांभेकर महामंडळ गठीत करण्याबाबत शासनाने करावयाची तातडीची उपायोजना."

**(१४) श्री. श्याम खोडे, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्र्यांचे लक्ष वेधतील:-**

"जिल्हा स्त्री रुग्णालय अकोला येथील वैद्यकीय अधीक्षक यांनी मनुष्यबळ पुरवठ्यांमध्ये मोठ्या प्रमाणात आर्थिक अनिमितता करणे, राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत एस.एन.सी यु मध्ये मनुष्यबळ सपोर्ट सर्विसच्या ई निविदा पोर्टल प्रक्रिया पूर्ण न करता जिल्हा स्त्री रुग्णालय अकोला येथे मनुष्यबळ सपोर्ट स्टाफचा बाह्य श्रोतामार्फत ई निविदा प्रक्रिया राबवून कंत्राटी पद्धतीने सेवा देणे बंधनकारक असतानाही ही प्रक्रिया राबवताना केवळ जेईएम पोर्टलवर निविदा करणे, या प्रक्रियेमध्ये ३० ते ४० निविदाकारांनी भाग घेतला परंतु त्यातील केवळ चारच निवेदकांना तांत्रिक लिफाफा उघडण्यासाठी सहभागी करून घेणे, त्यापैकीही केवळ दोनच पात्र दर्शविले असणे त्यामुळे दिनांक १/१२/२०१६ च्या शासन निर्णयानुसार कमीत कमी तीन निविदाकरांचे तांत्रिकदृष्ट्या निकष पूर्ण आल्यानंतरच दराचा लिफाफा उघडणे बंधनकारक असताना खामगाव येथील आर्थिक गैरव्यवहार करून प्रचंड मोठा भ्रष्टाचार केलेला असल्याचे निदर्शनास येणे, नियमानुसार निविदा प्रक्रिया राबवीत असताना वैद्यकीय अधीक्षक यांनी आपल्या मर्जीतील व्यक्तीकडून निविदा प्रक्रिया राबवून घेणे, त्यामुळे सदर प्रकरणाची शासनाने दखल घेऊन सखोल चौकशी करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी आणि जनतेकडून होत असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(१५) श्री. संजय उपाध्याय, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (नगर विकास) यांचे लक्ष वेधतील:-**

"मुंबई उपनगर जिल्हयातील वांद्रे-पुर्व या भागात 'तीन बंगला झोपडपट्टी' असणे, सदर झोपडपट्टीच्या जागेचा मिळकत पत्रिकेवर न.भू.क्र. ४१९, क्षेत्रफळ २४२.६ चौ. मी. असून, धारक सदरी फेरफार क्रमांक २३ नुसार वेस्टर्न रेल्वेच्या नावाची नोंद असणे, परंतू भूमापन क्रमांक ४१९ चे क्षेत्रफळ, त्यावरील वेस्टर्न रेल्वेचे नाव तसेच येथील झोपडपट्टी पुनर्वसनाबाबत वांद्रा-पुर्व विधानसभेचे विद्यमान आमदार यांची भूमिका इत्यादी बार्बीविषयी 'तीन बंगला झोपडपट्टी रहीवाशी परिवर्तन सहकारी गृहनिर्माण संस्था' (नियो) चे पदाधिकारी यांची हरकत असणे, तीन बंगला झोपडपट्टीची व लगतची जागा ही मो. र. नं. ८४७/२०१३ अन्वये मोजणी करण्यात आलेली असणे, त्यानुसार या आणि लगतच्या जागांना न.भू.क्र. ६७६,६७७,६७८ देण्यात आलेला असणे, नगर भूमापन अधिकारी वांद्रे यांच्या दिनांक २३.०९.२०२४ रोजीच्या पत्रानूसार न.भू. क्र. ४१९ व नव्याने तयार केलेला न.भू. क्र. ६७६ यांची जागा एकच असून, या दोन्हींचे मिळकत पत्रिकेवरील क्षेत्रामध्ये तफावत असून, दुरुस्तीप्रमाणे त्याचे क्षेत्र २३९१२.०० चौ.मी. असणे, असे असतानाही विद्यमान वांद्रे-पुर्व आमदार व त्यांचे निकटवर्तीय विकासक हे सदर जागा गावठाण घोषित करुन, सक्षम प्राधिकारी यांची परवानगी न घेता तसेच रेल्वेचे ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त न करता तीन बंगला झोपडपट्टीवासीयांचे पुनर्वसन करण्याचा प्रयत्न करीत असणे, याबाबत शासनाची करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका."

**(१६) श्री. जयंत पाटील, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (नगर विकास) यांचे लक्ष वेधतील:-**

"मौजे बुऱ्हाणनगर ता. जि. अहिल्यानगर येथील जगदंबा देवी मंदिरा समोरील सर्वे क्र, १/२+१/३ मधील बिनशेती प्लॉट मधील कायदेशीर असलेले बांधकाम बेकायदेशीरपणे पाडून टाकल्यामुळे झालेले २ कोटी रुपयांचे नुकसान, या बांधकामास दि. २२/०८/२०१२ रोजी तहसिलदार यांनी दिलेली परवानगी तसेच सदर बांधकामास पुर्णत्वाचा मिळालेला दाखला, सर्व कर व पाणी पट्टी नियमित भरण्यात येत असणे, या बांधकामास दि. २१/०२/२०२५ रोजी रहिवास या प्रयोजनाऐवजी वाणिज्य प्रयोजनासाठी सुधारित रेखांकनास हरकत नसल्याचे उपविभागीय अधिकाऱ्यांनी कळविले असणे असे असतांना दिनांक २०/०२/२०२५ रोजी या कायदेशीर असलेल्या जागेवरील बांधकाम मोठया पोलिस बंदोबस्तात उपविभागीय अधिकारी यांनी पाडून टाकणे, त्यामुळे त्या परिसरातील नागरीकांत पसरलेला तीव्र असंतोष. नियमित असलेले व सर्व कर भरत असलेले बांधकाम पाडल्यामळे जागेच्या मालकाचे दोन कोटी रूपयांचे झालेले नुकसान, झालेल्या नुकसानीची

परतफेड करण्याबाबत व ज्यांनी बांधकाम पाडले त्यांच्या विरुध्द कारवाई करण्याची होत असलेली मागणी यावर शासनाने केलेली वा करावयाची कारवाई."

**(ब) लक्षवेधी सूचना (म.वि.स. १०५ अन्वये) संबंधित निवेदने सभागृहासमोर ठेवणे :-**

(म.वि.स. नियम १०५ अन्वये सभागृहात चर्चेकरिता न आलेल्या लक्षवेधी सूचनांचे जोडपत्र अमुद्रित स्वरुपात सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येत आहे.)

**अकरा : (गुरुवार, दिनांक १७ जुलै, २०२५ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)**

**सर्वश्री रणधीर सावरकर, अर्जुन खोतकर, अब्दुल सत्तार, सुधीर मुनगंटीवार, दिलीप वळसे-पाटील, दिपक केसरकर, सुरेश धस, धनंजय मुंडे, रमेश बोरनारे, प्रशांत बंब, संजय बनसोडे, राजेंद्र गावित, संभाजी निलंगेकर-पाटील, डॉ.बालाजी किणीकर, सर्वश्री चेतन तुपे, नारायण कुचे, शांताराम मोरे, शेखर निकम, बबनराव लोणीकर, किशोर पाटील, प्रकाश सोळंके, अभिमन्यू पवार, निलेश राणे, महेश शिंदे, गोपीचंद पडळकर, अनिल पाटील, चंद्रदिप नरके, डॉ. अतुल भोसले, सर्वश्री संजय गायकवाड, राजकुमार बडोले, श्रीमती देवयानी फरांदे, सर्वश्री नरेंद्र भोंडेकर, चंद्रकांत सोनवणे, सर्वश्रीमती श्वेता महाले, मंजुळा गावित, श्री. प्रताप पाटील-चिखलीकर, डॉ.संजय कुटे, श्री. राजेश क्षिरसागर, श्रीमती सुलभा खोडके, सर्वश्री प्रकाश भारसाकळे, महेंद्र दळवी, श्रीमती सरोज अहिरे, सर्वश्री हरिष पिंपळे, महेंद्र थोरवे, श्रीमती सना मलिक, सर्वश्री प्रवीण दटके, किरण सामंत, दिलीप बनकर, देवराव भोंगळे, संतोष बांगर, बालाजी कल्याणकर, डॉ.किरण लहामटे, श्रीमती सीमाताई हिरे, सर्वश्री चंद्रकांत पाटील, विलास तरे, हिरामण खोसकर, रमेश कराड, अमोल पाटील, चंद्रकांत नवघरे, श्रीमती नमिता मुंदडा, सर्वश्री सुहास कांदे, अमोल खताळ, डॉ. तुषार राठोड, सर्वश्री विठ्ठल लंघे, राजेश पवार, बाबुराव कदम-कोहळीकर, आनंद तिडके, राणाजगजितसिंह पाटील, हिकमत उढाण, राजेंद्र यड्रावकर-पाटील, विक्रम पाचपुते, राजेश मोरे, विजय शिवतारे, ॲड. राहुल कुल, डॉ.तानाजी सावंत, श्री. सुहास बाबर, डॉ. सुरेश खाडे, सर्वश्री सत्यजित देशमुख, शंकर मांडेकर, सुभाष देशमुख, अनुपभैय्या अग्रवाल, काशिराम पावरा, विजय देशमुख, दिलीप बोरसे, श्रीमती मोनिका राजळे, सर्वश्री महेश लांडगे, मंगेश चव्हाण, प्रताप अडसड, प्रविण तायडे, राजू तोडसाम, समीर कुणावार, राजेश वानखडे, राजेश बकाने, विनोद अग्रवाल, विजय रहांगडाले, किशोर जोरगेवार, डॉ. मिलिंद नरोटे, श्रीमती सई डहाके, सर्वश्री श्याम खोडे, आमश्या पाडवी, श्रीमती रंजनाताई जाधव, सर्वश्री शरद सोनवणे, उमेश**

**यावलकर, किसन वानखेडे, कृष्णा खोपडे, किर्तीकुमार भांगडिया, तान्हाजी मुटकुळे, श्रीमती अनुराधा चव्हाण, ॲड.श्रीजया चव्हाण, सर्वश्री जितेश अंतापुरकर, करण देवतळे, चरणसिंग ठाकूर, सुधीर गाडगीळ, अमल महाडिक, हेमंत रासने, सुनिल कांबळे, मनोज घोरपडे, सचिन कल्याण-शेट्टी, शंकर जगताप, राजेश पाडवी, डॉ. आशिष देशमुख, श्री. राघवेंद्र पाटील, ॲड. राहुल ढिकले, सर्वश्री चैनसुख संचेती, केवलराम काळे, संजय पुराम, समीर मेघे, संतोष दानवे, भिमराव तापकीर, भिमराव केराम, अमोल जावळे, रत्नाकर गुट्टे, सिध्दार्थ शिरोळे, राहुल आवाडे, देवेंद्र कोठे, डॉ. विजयकुमार गावित, डॉ. राहुल आहेर, सर्वश्री मोहन मते, किसन कथोरे, प्रशांत ठाकूर, शिवाजी पाटील, काशिनाथ दाते, विजयसिंह पंडित, ज्ञानेश्वर कटके, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव :- (चर्चा पुढे सुरु व मंत्र्यांचे उत्तर)**

"राज्याच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेत कृषी क्षेत्र केंद्रस्थानी ठेऊन राज्यात सिंचन क्षेत्राकडे विशेष लक्ष देण्याचा शासनाचा प्रयत्न असणे, कृषी क्षेत्रात कृत्रिम बुध्दिमता (ए-आय) तंत्रज्ञानाचा वापर करण्याचे धोरण अंमलात आले असणे, जलयुक्त शिवार योजना, नदीजोड प्रकल्प आणि रखडलेल्या सिंचन योजनांच्या माध्यमातून कृषी सिंचन वाढविण्यावर भर देण्यात आला असणे, विदर्भातील वैनगंगा-पैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्प पूर्ण झाल्यास १० लाख एकर जमिन ओलिताखाली येण्याची शक्यता असणे, नार-पार-गिरणा नदीजोड प्रकल्पामुळे नाशिक व जळगाव जिल्हयातील ४९,५१६ हेक्टर क्षेत्राला सिंचनाचा लाभ होणार असणे, दमणगंगा-एकदरे-गोदावरी या २३०० कोटी रुपये किंमतीच्या नदीजोड प्रकल्पामुळे ३.५५ टीएमसी पाणी उपलब्ध होणार असणे, तापी महापुनर्भरण या १९,३०० कोटी रुपये किंमतीच्या सिंचन प्रकल्पामुळे उत्तर महाराष्ट्र आणि पश्चिम विदर्भातील खारपाण पट्ट्यातील शेतकऱ्यांना लाभ होणार असणे, महाकृषी विकास अभियान अंतर्गत केवळ १ रुपयात राबविण्यात येणाऱ्या पिक विमा योजनेत नियमितता ठेवण्याच्या दृष्टीने कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांनी अधिक सतर्क होण्याची आवश्यकता, अटल भूजल योजना अधिक गतीमान करण्याची आवश्यकता, नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प टप्पा-२ ला मंत्रीमंडळाची मान्यता मिळणे, कोकणातील उल्हास आणि वैतरणा नद्यांच्या खोऱ्यातून ५४.७० टीएमसी पाणी गोदावरी खोऱ्यात वळविण्याचा प्रकल्प प्रस्तावित असणे, राज्यात शेतकऱ्यांसाठी अतिशय महत्वाचे पांदण रस्ते तातडीने पूर्ण करण्याकरिता "मातोश्री पांदण रस्ते योजना" अधिक सुटसुटीत करुन राबविण्याची आवश्यकता, राज्यात सन २०२४-२०२५ च्या हंगामांतर्गत सोयाबीन, तूर, ज्वारी, चना, कापूस इ. धान खरेदी झाली असणे, शासकीय खरेदी योजनेतील अनियमितता टाळण्यासाठी योजना सक्षम करण्याची आवश्यकता, राज्यात काही गावांतील शेतकऱ्यांना डिजिटल पध्दतीने देण्यात येणारे लाभ मिळण्यात असलेल्या अडचणी दूर करण्याची आवश्यकता, 'मॅगनेट २.०' अंतर्गत कृषी व्यवसायाला चालना देण्यासाठी विशेष योजना हाती घेण्यात आली असणे, ऊर्जा वापराला प्रोत्साहन देतानाच ऊर्जा निर्मितीवर भर देण्यात येत असणे, १६००० मेगावॅट क्षमतेच्या सौरऊर्जा प्रकल्पांना गती देण्याचे धोरण आखण्यात येणे जेणेकरुन, शाश्वत व स्वच्छ ऊर्जा मिळेल आणि

औद्योगिक क्षेत्राला त्याचा फायदा होईल, राज्यातील सर्व शासकीय इमारती सन २०२५ या वर्षाच्या अखेरपर्यंत संपूर्णपणे सौरऊर्जेद्वारे विद्युतीकरण करण्याचे धोरण असणे, शेतक-यांना सिंचनासाठी सौर कृषीपंप उपलब्ध करून देणारी "मुख्यमंत्री सौर कृषी योजना" राज्यात प्रभावीपणे राबविण्यात येत असणे, सौर ऊर्जेचा वापर वाढवून शाश्वत शेतीला प्रोत्साहन देण्याचे शासनाचे उद्दिष्ट असणे, महाराष्ट्र देशासाठी रोल मॉडेल व्हावे व राज्यातील शेतकरी सुजलाम-सुफलाम व्हावा यासाठी करावयाची कार्यवाही व उपाययोजना. "

**बारा : (गुरुवार, दिनांक १७ जुलै, २०२५ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)**

**सर्वश्री अतुल भातखळकर, अर्जुन खोतकर, दिलीप वळसे-पाटील, डॉ.संजय कुटे, सर्वश्री अब्दुल सत्तार, धनंजय मुंडे, ॲड. राहुल कुल, डॉ.तानाजी सावंत, श्री. संजय बनसोडे, डॉ.राहुल आहेर, सर्वश्री दिपक केसरकर, चेतन तुपे, रणधीर सावरकर, रमेश बोरनारे, शेखर निकम, श्रीमती सीमाताई हिरे, सर्वश्री राजेंद्र गावित, प्रकाश सोळंके, श्रीमती देवयानी फरांदे, सर्वश्री विजय शिवतारे, अनिल पाटील, श्रीमती मनिषा चौधरी, डॉ.बालाजी किणीकर, सर्वश्री शांताराम मोरे, सुधीर मुनगंटीवार, राजकुमार बडोले, किशोर पाटील, श्रीमती श्वेता महाले, सर्वश्री प्रताप पाटील-चिखलीकर, मंगेश कुडाळकर, सर्वश्रीमती सुलभा गायकवाड, सुलभा खोडके, सर्वश्री प्रकाश सुर्वे, गोपीचंद पडळकर, नरेंद्र भोंडेकर, श्रीमती सरोज अहिरे, सर्वश्री प्रशांत बंब, निलेश राणे, श्रीमती सना मलिक, सर्वश्री विक्रम पाचपुते, महेश शिंदे, दिलीप बनकर, प्रवीण दटके, संजय गायकवाड, प्रदीप जैस्वाल, हरिष पिंपळे, डॉ.किरण लहामटे, सर्वश्री देवराव भोंगळे, राजेश क्षिरसागर, चंद्रकांत नवघरे, डॉ. तुषार राठोड, श्रीमती मंजुळा गावित, सर्वश्री सचिन पाटील, सुमित वानखेडे, चंद्रकांत सोनवणे, सुहास कांदे, अभिमन्यू पवार, शंकर मांडेकर, चंद्रदिप नरके, सुनिल कांबळे, काशिनाथ दाते, महेंद्र दळवी, भिमराव तापकीर, नारायण कुचे, नरेंद्र मेहता, महेंद्र थोरवे, विजयसिंह पंडित, अशोक पाटील, किसन कथोरे, हिरामण खोसकर, बालाजी कल्याणकर, संजय केळकर, ज्ञानेश्वर कटके, संतोष बांगर, मोहन मते, विलास तरे, संतोष दानवे, विश्वनाथ भोईर, उमेश यावलकर, चंद्रकांत पाटील, किशोर जोरगेवार, आमश्या पाडवी, महेश लांडगे, राजेंद्र यड्रावकर-पाटील, शरद सोनवणे, समीर कुणावार, श्रीमती रंजनाताई जाधव, सर्वश्री अमित साटम, मुरजी पटेल, दिलीप लांडे, योगेश सागर, तुकाराम काते, अमोल पाटील, ॲड. पराग अळवणी, सर्वश्री किरण सांमत, सुहास बाबर, विठ्ठल लंघे, प्रकाश भारसाकळे, बाबुराव कदम-कोहळीकर, सत्यजित देशमुख, सुरेश धस, बबनराव लोणीकर, समाधान आवताडे, आनंद तिडके, हिकमत उढाण, डॉ. अतुल भोसले, सर्वश्री अमोल खताळ, राजेश मोरे, मंगेश चव्हाण, विलास भुमरे, मिहिर कोटेचा, पराग शाह, मोनिका राजळे, अनुपभैय्या अग्रवाल, समीर मेघे, प्रशांत ठाकूर, श्रीमती मंदा म्हात्रे, सर्वश्री संजय उपाध्याय, राजन नाईक, राणाजगजितसिंह पाटील, राजेश पवार,**

**डॉ. सुरेश खाडे, सर्वश्री प्रताप अडसड, सुभाष देशमुख, राजेश वानखडे, विजय देशमुख, राजेश बकाने, डॉ. आशिष देशमुख, सर्वश्री देवेंद्र कोठे, सचिन कल्याण-शेट्टी, श्याम खोडे, श्रीमती अनुराधा चव्हाण, ॲड. श्रीजया चव्हाण, सर्वश्री जितेश अंतापुरकर, अमल महाडिक, शंकर जगताप, चैनसुख संचेती, केवलराम काळे, हेमंत रासने, करण देवतळे, डॉ मिलिंद नरोटे, श्री. रत्नाकर गुट्टे, कॅ. आर. तमील सेल्वन, कृष्णा खोपडे, शिवाजी पाटील, काशिराम पावरा, दिलीप बोरसे, चरणसिंग ठाकूर, किसन वानखेडे, सुधीर गाडगीळ, विजय रहांगडाले, ॲड. राहुल ढिकले, सर्वश्री अमोल जावळे, सिध्दार्थ शिरोळे, राहुल आवाडे, राघवेंद्र पाटील, संजय पुराम, राजू तोडसाम, मनोज घोरपडे, किर्तीकुमार भांगडिया, श्रीमती सई डहाके, सर्वश्री रमेश कराड, संभाजी निलंगेकर-पाटील, सुरेश भोळे, विनोद अग्रवाल, रविशेठ पाटील, तान्हाजी मुटकुळे, प्रविण तायडे, शिवाजी कर्डिले, भिमराव केराम, श्रीमती स्नेहा दुबे, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव :- (चर्चा पुढे सुरु व मंत्र्यांचे उत्तर)**

"राज्यात परकीय थेट गुंतवणूक आणि स्टार्टअप संख्येच्या बाबतीत महाराष्ट्र राज्य देशात आघाडीवर असणे, शासनाने स्टार्टअप युको सिस्टीम उभी करण्यासाठी १२० कोटी रुपयांचा 'फंड ऑफ फंडस्' तयार केला असून त्यायोगे आर्थिक सक्षम आणि विक्रीयोग्य स्टार्टअप्सना आर्थिक मदत दिली जाणार असणे, सर्क्युलर इकॉनॉमीवर भर देत महाराष्ट्र राज्य देशाची स्टार्टअप राजधानी बनली असणे, समृध्दी महामार्गामुळे राज्यातील अनेक जिल्ह्यांचा भूगोल व अर्थकारण बदलणार असणे, दावोस येथे ६३ कंपन्यांशी झालेल्या सामंजस्य करारातून १५ लाख ७२ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक आणि १६ लाख रोजगार निर्मिती अपेक्षित असणे, नवीन औद्योगिक धोरणातून सूक्ष्म, लघु, मध्यम उद्योगांना प्रोत्साहन देण्यासोबतच अंतराळ, संरक्षण, इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्रात गुंतवणूक आकर्षित करण्याचे नियोजन असल्याने राज्यातील तरुणांना रोजगारांच्या नव्या संधी उपलब्ध होणार असणे, पुर्व व पश्चिम विदर्भात औद्योगिक व परकीय गुंतवणूक करण्याची व कापुस उत्पादकांच्या आत्महत्या रोखण्याकरिता कापड उद्योगास चालना देण्याची आवश्यकता, राज्यातील मुंबई, नागपूर, पुणे, पिंपरी-चिंचवड, नाशिक, संभाजीनगर इ. मधील शहरी भागात वारंवार विज खंडीत होणे, अनियमित पाणीपुरवठा, मलः निस्सारण प्रकल्पांची कमतरता, भुयारी गटारे इ. मुलभूत नागरी समस्या भेडसावत असल्याने त्यांचे निराकरण करण्याकरिता तातडीने लक्ष देण्याची व प्रारुप विकास आराखडयामध्ये त्याबाबत तरतूद करण्याची आवश्यकता, महिला सक्षमीकरणासाठी राज्यात आदिशक्ती अभियान राबविण्यात येणार असणे, महिलांच्या सामाजिक, शैक्षणिक, आरोग्यविषयक समस्या सोडविण्याचा प्रयत्न करणा-या महिलांना आदिशक्ती पुरस्कार प्रदान करण्याचा निर्णय घेण्यात येणे, महिलांच्या आरोग्याबाबतच्या समस्यांचे संवेदनशीलपणे निवारण करणे, कुपोषण, बालमृत्यू, मातामृत्यूचे प्रमाण कमी करणे, मुलींमध्ये शिक्षणाचे प्रमाण वाढविणे, लैंगिक आणि शारीरिक अत्याचाराला प्रतिबंध करणे, पंचायत राज पध्दतीत महिला नेतृत्वाचा सहभाग वाढविणे, महिलांना आर्थिक

सक्षम करणे इ. या अभियानाची उद्दीष्ट असणे, लोकमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंतीच्या पावनपर्वात राज्यातील महिला स्वयंसिध्दा होण्याच्या दृष्टीने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महिला स्टार्टअप योजना सुरु करण्यात आली असणे, या योजनेंतर्गत १५ एप्रिल, २०२५ पर्यंत ५२ महिलांना एकूण २ कोटी ३४ लाख रुपयांचे आर्थिक सहाय्य देण्यात आले असणे, राज्यातील महिलांमध्ये 'जागतिक दर्जाचे कुशल मनुष्यबळ तयार करणे' आणि नोकरी मागणाऱ्याऐवजी नोकऱ्या देणारे नागरिक घडविणे यासाठी महिलांचे योगदान निर्णायक ठरणार असणे, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सहकारी तत्वावरील महामंडळासाठी १० हजार कोटी रुपयांची तरतूद केली असणे, मेंढपाळांसाठी कर्ज योजना, पावसाळ्यात चराई रान राखून ठेवणे, राज्यातील धनगर वाडयांना मुख्य रस्त्यांशी जोडणे, धनगर समाज बांधवांसाठी दरवर्षी २५ हजार घरे बांधणे इ. धोरण राबविण्यात येणे, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या मंदिर पुनर्निमाणाच्या कामाला अभिवादन म्हणून राज्यातील विविध ७ तिर्थस्थळांच्या विकासासाठी ५,५०३ कोटी रुपयांच्या आराखड्याला मंजूरी देण्यात आली असणे, अहिल्यानगर येथे मुलींसाठी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था सुरु करण्यात आली असणे, पुण्यश्लोक अहिल्यादेवींच्या स्मृतीस्थळांचे जतन व संवर्धनासाठी ६८१ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असणे, 'विकसित भारत व विकसित महाराष्ट्र' घडविण्यासाठी अधिक कार्यवाही करण्याच्या दृष्टीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**तेरा : अंतिम आठवडा प्रस्ताव :-**

**(गुरुवार, दिनांक १७ जुलै, २०२५ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९२ अन्वये प्रस्ताव)**

**सर्वश्री जयंत पाटील, आदित्य ठाकरे, विजय वडेट्टीवार, डॉ. जितेंद्र आव्हाड, सर्वश्री भास्कर जाधव, नाना पटोले, रोहित पाटील, सुनिल प्रभू, डॉ. नितीन राऊत, सर्वश्री रोहित पवार, अजय चौधरी, अमीन पटेल, उत्तमराव जानकर, दिलीप सोपल, अमित देशमुख, संदिप क्षिरसागर, डॉ. राहुल पाटील, सर्वश्री अस्लम शेख, बापूसाहेब पठारे, कैलास घाडगे-पाटील, डॉ. विश्वजीत कदम, सर्वश्री नारायण पाटील, सुनिल राऊत, अमित झनक, अभिजीत पाटील, संजय पोतनीस, विकास ठाकरे, राजू खरे, नितीन देशमुख, शिरीषकुमार नाईक, वरुण सरदेसाई, संजय मेश्राम, डॉ. बाबासाहेब देशमुख, श्री. अनंत (बाळा) नर, डॉ. ज्योती गायकवाड, सर्वश्री हारुन खान, साजिद खान पठाण, महेश सावंत, हेमंत ओगले, प्रविण स्वामी, रामदास मसराम, अनिल मांगुळकर, मनोज जामसुतकर, गजानन लवटे, सिध्दार्थ खरात, संजय देरकर, बाबाजी काळे, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९२ अन्वये प्रस्ताव :- (मंत्र्यांचे उत्तर)**

"राज्यात खुनाच्या घटनांमध्ये झालेली प्रचंड वाढ, राज्यात अंमली पदार्थांचा वाढलेला वापर, राज्यातील महिला व बालिका तसेच मुलांवर सुद्धा अत्याचार व

बलात्काराचे वाढत असलेले गुन्हे, एकंदरीतच राज्यात बिघडलेली कायदा व सुव्यवस्था, राज्यात महापुरुषांच्या प्रतिमांची व पुतळ्यांची होत असलेली विटंबना, त्यास आळा घालण्यास पोलिस यंत्रणेस आलेले अपयश, राहुरी, जिल्हा अहिल्यानगर येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अर्धाकृती पुतळ्याची झालेली विटंबना, विटंबना करणाऱ्या आरोपींना अटक करण्यास सरकारला आलेले अपयश, ठाणे शहरात जमील शेख यांची झालेली निर्घृण हत्या व तपासातील पोलिसांचा हलगर्जीपणा, ठाणे येथील एका ट्रस्टच्या विश्वस्तांनी बेकायदेशीररित्या जमीन विक्री करुन सुमारे २ हजार कोटींचा केलेला आर्थिक घोटाळा, यामध्ये प्रशासनातील अधिकारी कर्मचाऱ्यांचे संगनमत असणे, सदर प्रकरणी मा. मुख्यमंत्री महोदयांनी आश्वासन देऊन सुद्धा कार्यवाही करण्यासाठी पोलीस करत असलेली चाल-ढकल, येऊर, जिल्हा ठाणे येथील वन विभाग आणि आदिवासी व्यक्तींच्या ७५ एकर जमीनी खाजगी व्यक्तींकडून हक्क नसतांना बेकायदेशीररित्या ताब्यात घेऊन बंगले बांधण्यात येणे, आदिवासींच्या जमिनी जबरदस्तीने हडप करणे, पुरोगामी कार्यकर्ते श्री. प्रवीण गायकवाड यांच्यावर झालेला जीवघेणा हल्ला, त्यात पोलिस यंत्रणेचा सहभाग असल्याचा संशय, दोषींवर कडक कारवाई करण्याची होत असलेली मागणी, राजकीय कार्यकर्त्यांवर खोटे गुन्हे दाखल करण्याचे राज्यात वाढलेले प्रमाण, बीड येथील महादेव मुंडे हत्या प्रकरण, परभणी येथील सोमनाथ सुर्यवंशी हत्या प्रकरण, कामराज निकम ता. शिंदखेडा जि. धुळे यांच्यावर आकसापोटी दाखल केलेले खोटे गुन्हे, असे खोटे गुन्हे दाखल करणा-या पोलिस अधिका-यांवर कारवाई करण्याची होत असलेली मागणी, विठाबाई पडळकर, वय वर्ष ८२ रा. पडळकरवाडी, ता. आटपाडी येथे राहणाऱ्या महिलेची फसवणूक करून तिची १७ एकर जमीन लाटल्याचा घडलेला प्रकार त्यावर कार्यवाही करण्याबाबत पोलीस तसेच महसूल यंत्रणा करत असलेली दिरंगाई, यश यादव या विद्यार्थ्याचा श्रद्धा अकॅडमी, इचलकरंजी येथील हॉस्टेलमध्ये झालेला संशयास्पद मृत्यू, त्यावर पोलिसांच्या तपासातील हलगर्जीपणा, बनावट शासन निर्णय काढून अहिल्यानगर जिल्ह्यामध्ये विकासकामे करून शासनाची केलेली फसवणूक, सार्वजनिक बांधकाम, नगरविकास, पाणी पुरवठा या विभागांमध्ये कंत्राटदारांची थकलेली बिले व त्यामुळे विकासकामांवर होणारा परिणाम, सामाजिक न्याय विभाग व आदिवासी विकास विभागाचा निधी इतर विभागांकडे वळवून मागासवर्गीय समाजावर करण्यात आलेला अन्याय, राज्यातील विशेषतः नागपूर जिल्ह्यात शिक्षक भरती प्रक्रियेमध्ये झालेला घोटाळा, विविध विभागात वस्तू वाटप योजनेमध्ये अधिकारी व कंत्राटदारांच्या रॅकेट ने केलेला प्रचंड भ्रष्टाचार, बांधकाम कामगार मंडळातील सचिवाला नियमबाह्य पद्धतीने दिलेली मुदतवाढ, वीज कायदा २००३ मधील तरतुदींविरुद्ध महावितरण कंपनी मार्फत ग्राहकांकडून करण्यात येत असलेली "वहन शुल्काची" वसुली, नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना अद्यापपर्यंत न मिळालेले प्रोत्साहनपर अनुदान, शासनाने विधानसभा निवडणुकीपूर्वी विविध महामंडळांची स्थापना करण्याची केलेली घोषणा, परंतु अद्यापही त्यावर न झालेली कार्यवाही, परशुराम आर्थिक विकास महामंडळाची स्थापना झालेली नसताना बेकायदेशीरपणे केलेले कार्यालयाचे उद्‌घाटन, माहे डिसेंबर, २०२४ पासून आतापर्यंत ७ ते ८ महिन्यांमध्ये राज्यात गैरव्यवहार व

गैरप्रकाराची अनेक प्रकरणे उघडकीस येणे, अहिल्यानगर जिल्ह्यातील प्रवरानगर येथील एका साखर कारखान्याने बनावट कागदपत्रे तयार करुन बँकेकडून शेतकरी, सभासद यांचे नावे ८ कोटी ८६ लाख रुपयांचे कर्ज मंजूर करुन केलेला गैरव्यवहार, याप्रकरणी ५४ व्यक्तींविरुध्द एप्रिल, २०२५ मध्ये फसवणुकीचे दाखल करण्यात आलेले गुन्हे, मुंबईतील जुहुतारा रोड येथील "आजिवसन" गृहकुल संकुलासाठी एक शासकीय भूखंड मे, १९८८ मध्ये आणि दुसरा भूखंड एप्रिल २००३ मध्ये देण्याचा घेतलेला निर्णय, सदर निर्णयातील अटी व शर्तीचा भंग संबंधित संस्थेने केला असल्याचे निवासी उपजिल्हाधिकारी यांनी केलेल्या चौकशीच्या अहवालात नमूद असणे, मुंबईतील मिठी नदीमधील गाळ उपसणे, सफाई करणे इत्यादी कामात ६५ कोटी रुपयांचा करण्यात आलेला गैरव्यवहार, सदर प्रकरणी आर्थिक गुन्हे शाखेच्या अधिका-यांनी आझाद मैदान पोलीस स्थानकात मे, २०२५ मध्ये गुन्हा नोंदविणे, बीड जिल्ह्यातील मस्साजोग ग्रामपंचायतीचे सरपंच संतोष देशमुख यांच्या क्रूर हत्याप्रकरणी तत्कालीन मंत्र्यांचे वृत्तपत्रात आलेले नाव, वस्तु व सेवा (जीएसटी) विभागातील अधिकारी/कर्मचारी करदात्यांची गोपनीय माहिती इतरांना पैशाच्या बदल्यात देत असल्याची मे, २०२५ मध्ये मा. उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री यांचेकडे करण्यात आलेली तक्रार, मुंबईतील गोवंडी येथील शिवाजीनगर पोलीस स्थानकातील वरिष्ठ पोलीस निरिक्षकांनी एका शैक्षणिक संस्थेकडून १ लाख रुपयांची लाच घेताना दि.१३ मे, २०२५ रोजी त्यांना करण्यात आलेली अटक, धुळे येथील शासकीय गुलमोहर विश्रामगृहातील कक्ष क्र.१०२ मध्ये दि.२१ मे, २०२५ च्या सुमारास पोलीसांकडून जप्त करण्यात आलेली सुमारे १ कोटी ८४ लाख रुपयांची रोख रक्कम, सदर प्रकरणी चौकशी अहवालास होत असलेला विलंब, ३४१ कोटी रुपयांच्या गैरव्यवहाराची दि.०४ जून, २०२५ च्या सुमारास सामाजिक कार्यकर्त्या श्रीमती अंजली दमानिया यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या अधिकाऱ्यांकडे सुपुर्द केलेली कागदपत्रे, याबाबत त्वरीत चौकशी करण्याची आवश्यकता, बनावट कागदपत्रांच्या आधारे शासकीय सदनिका घेतल्याच्या प्रकरणात एका मंत्र्यांना नाशिक जिल्हा सत्र न्यायालयाने दोन वर्षाची शिक्षा देण्याचा दिलेला निर्णय, छत्रपती संभाजीनगर येथील वेदांत हॉटेल (नवीन नाव विट्स) च्या मुल्यांकन अहवालानुसार ११० कोटी रुपये किंमत असतांना केवळ ६५ ते ६७ कोटी रुपयांना एका मंत्र्याच्या मुलाचा समावेश असलेल्या कंपनीने केलेली खरेदी, सदर गैरव्यवहाराची चौकशी करण्याची मा. मुख्यमंत्री यांचेकडे करण्यात आलेली मागणी, याच मंत्र्याच्या घरी नोटा असलेली बॅग व बाजूला मंत्री महोदय सिगारेट ओढत असल्याचे वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेले फोटो, सन २०१९ ते २०२२ या कालावधीत नागपूर व इतर अनेक जिल्ह्यात १ हजारांहून अधिक अपात्र शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी नावे यादीत सामील करुन हजारो कोटी रुपयांचा गैरव्यवहार केल्याप्रकरणी चौकशी करण्याचे मा. शिक्षणमंत्री यांनी संबंधितांना एप्रिल, २०२५ मध्ये दिलेले आदेश, एका मंत्र्याचे स्वीय सहाय्यक यांनी दोन कोटी रुपये खंडणी मागितल्याची एक महिलेने दहिवडी पोलीस स्थानकात दाखल केलेली तक्रार, गेल्या ६ महिन्यांपासून राज्यातील शिवभोजन केंद्रांना निधी मिळत नसल्याने सदर केंद्र बंद पडण्याचा निर्माण झालेला धोका, त्यामुळे गोरगरीब जनतेचे होणारे हाल, राज्यातील ग्रामीण भागामध्ये सर्पदंश,

विंचूदंश, प्रसुती इत्यादी आरोग्य सेवांचा उडालेला बोजवारा CCMP व BHMS डॉक्टरांना महाराष्ट्र मेडीकल काउन्सीलमध्ये रजिस्ट्रेशन मिळण्यासाठी येणाऱ्या अडचणी, सदर डॉक्टरांना शासकीय सेवेत सामावून घेण्याबाबत शासन निर्णय होऊनही अद्यापही सामावून न घेणे, सदर मागणीसाठी जवळपास १ लाख डॉक्टरांनी आझाद मैदान येथे गेले ३ दिवस केलेले धरणे आंदोलन, कोल्ड चेन उपकरण खरेदीमध्ये झालेला गैरव्यवहार, मुंबई शहरातील जुन्या इमारतींच्या पुनर्विकासामध्ये येणाऱ्या अडचणी, मुंबईतील एसआरए योजनेमध्ये होत असलेला मोठ्या प्रमाणातील गैरव्यवहार, त्याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष. आरे कॉलनी मेट्रो कारशेड आंदोलकांवरील गुन्हे मागे घेण्याची आवश्यकता, उल्हासनगर महानगरपालिका हद्दीत म्हारळ उल्हासनगर येथील स.न. ४० ते ५८ मधील ८३ एकर ०९ गुंठे जमीनीच्या हस्तांतरण प्रकरणात विविध अनियमितता व अधिकाराच्या कक्षेचे उलंघन करण्यात येणे, अश्या प्रकारे मुंबई व ठाणे येथे अनेक बिल्डींग व बांधकाम व्यवसायिक करत असलेला गैरव्यवहार, अधिराज कॅपिटल सिटी, रोहिंजण, अप्पर खारघर, ता पनवेल येथील रहिवाशांना रस्ता व पाण्याअभावी प्रचंड मानसिक व शारीरिक त्रास झाला असणे, ओसी न मिळाल्यामुळे सद्यस्थितीत सुमारे ५०० कुटुंबांना घराचा ताबा दिला असला तरी रस्ता, पाणी, वीज, उदवाहन इत्यादी मुलभूत सुविधांच्या अभावी प्रचंड त्रासाला सामोरे जावे लागणे, महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी अंतर्गत असलेल्या महाजनको मध्ये झालेल्या अतिरिक्त कार्यकारी अभियंता व कार्यकारी अभियंता या पदांच्या भरती प्रक्रियेत गंभीर त्रुटी, अन्याय व अपारदर्शकता असणे, भामरागड तालुक्यातील पंचायत समितीतील बीडीओने रोहयोची कामे न करता करोडो रुपयांची बिले काढून केलेला भ्रष्टाचार, गडचिरोली जिल्हयातील अंगणवाडी सेविका, मदतनीस भरतीमध्ये खोटे शैक्षणिक प्रमाणपत्र जोडून पात्र करुन केलेला गैरप्रकार, धनगर समाजातील मुलांना इंग्रजी माध्यमाच्या शिक्षणासाठी खोटी विद्यार्थी संख्या दाखवून जालना, संभाजीनगर जिल्हयातील अनेक संस्था चालकांनी केलेली लूट, नागपूर विभागात सार्वजनिक वितरण व्यवस्थेसह अन्न धान्य वाहतूक पुरवठयाचे कंत्राट अन्न व नागरी पुरवठा विभागाने नियमबाहय ठेका देऊन वाहतूकदार व अधिकाऱ्यांशी संगनमताने केलेला भ्रष्टाचार आणि भंडारा, गोंदिया जिल्हयात मोठ्या प्रमाणात विकलेला तांदुळ निदर्शनास येऊनही कार्यवाही न होणे, तसेच काळया यादीतील कंत्राटदारास पुरवठा आदेश देणे, वारंवार मुदतवाढ देणे, यातून मोठया प्रमाणात झालेला गैरव्यवहार याबाबत करावयाची कार्यवाही."

**चौदा : अर्धा-तास चर्चा (म.वि.स. नियम ९४ अन्वये) :-**

**(गुरुवार, दिनांक १७ जुलै, २०२५ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या अर्धा तास चर्चेच्या सूचना) (क्रमांक १ ते ९)**

**(१) श्री. सुनिल प्रभू, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीबर चर्चा उपस्थित करतील.**

"मुंबईतील बोरिवली (पूर्व), संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील वन विभागाच्या जागेतील २५,१४४ आदिवासी व अतिक्रमित झोपडीधारकांचे

पुनर्वसन करुन अतिक्रमणे निष्कासित करण्याचे दि. ७-५-१९९७ रोजी मा.उच्च न्यायालयाने आदेश दिले असतानाही अद्याप याबाबत २८ वर्षे इतका कालावधी होऊनही २५,१४४ पैकी १३७८६ झोपडीधारकांचे पुनर्वसन करणेबाबत शासनाकडून कोणतीही ठोस कार्यवाही न झाल्याने सदरहू झोपडीधारकांचा प्रश्न अद्यापही प्रलंबीत अवस्थेत असणे, एकूण पात्र झोपडीधारकांपैकी दिंडोशी विधानसभा क्षेत्रातील सीएस क्र. २३९/१ मधील वन विभागाच्या जागेतील रु. ७०००/- शुल्क भरलेल्या पात्र झोपडीधारकांचे अद्यापही पुनर्वसन करण्यात न येणे, शासनाचे वन विभागाचे व एसआरए प्राधिकरणाच्या संबंधित अधिकाऱ्यांनी पुनर्वसनासाठी निश्चित केलेली आरे वसाहतीतील वन क्षेत्राची ९० एकर जागा ही संवेदनशील क्षेत्र म्हणून शासनाने दि. ५-१२-२०१६ रोजी शासन निर्णय जारी केला असल्याची माहिती लपवून सदरहू ९० एकर जागेत झोपडीधारकांचे एसआरए योजने अंतर्गत पुनर्वसन करण्याचा धक्कादायक निर्णय घेणे, संजय गांधी उद्यान हे मुंबईचे ऑक्सीजन स्त्रोत असून ते अतिक्रमण मुक्त करण्यास २८ वर्षे कालावाधी पूर्ण होऊनही ठोस कृती न झाल्याने शासनावर गंभीर ताशेरे ओढून उद्यान अतिक्रमण मुक्त करण्याचे मा.उच्च न्यायालयाने दि. १४-१-२०२५ रोजी शासनास आदेश देणे, त्यानुसार शासनाने उर्वरित १३७८६ झोपडीधारकांचे पुनर्वसन करणेसाठी कृती आराखडा तयार करुन तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(२) **श्री. देवराव भोंगळे, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीबर चर्चा उपस्थित करतील.**

"नांदाफाटा (ता.कोरपना, जि.चंद्रपूर) येथे असलेल्या अल्ट्राटेक, माणिकगड सिमेंट कंपनीव्दारे मोठ्या प्रमाणात प्रदूषण होत असल्याची तक्रार नागरिकांनी शासनाकडे वारंवार करणे, सदर कंपनीच्या परिसरामध्ये प्रदूषण नियंत्रण करणाऱ्या मशिनरी अकार्यक्षम असणे, प्रदूषण कमी करण्याबाबत या भागातील नागरिकांनी आंदोलने, मोर्चे काढून आपली तक्रार दाखल केल्यानंतर सुध्दा कोणतीही कारवाई न होणे, कंपनीच्या व्यवस्थापक मंडळाने पर्यावरण प्रदूषण विषयक प्रकरणे पूर्णपणे दाबली जात असल्याची बाब समोर येणे, कंपनीच्या प्रदूषणामुळे परिसरातील नागरिकांना क्षयरोग, कर्करोग, श्वसनाचे रोग, चर्मरोग सारखे आजार झाले असल्याची बाब समोर येणे, या कारखान्यातून निघणारे सांडपाणी उघड्या मार्गाव्दारे विविध नदी व नाल्यांमध्ये सोडले जात असल्यामुळे जलप्रदूषणाची समस्या समोर येणे, सदर कारखान्याच्या प्रदूषणाला दरवर्षी प्रदूषण नियंत्रण मंडळ व पर्यावरण विभागाकडून प्रदूषण होत नसल्याची क्लिनचीट मिळत असणे, सदरहू बाब गंभीर असल्याने या कारखान्यांवर शासनाने तात्काळ कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(३) डॉ. नितीन राऊत, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीबर चर्चा उपस्थित करतील.**

"विदर्भातील अनेक तालुक्यात अनेक दुर्गम आदिवासी पाडे येत असल्यामुळे तेथे पावसाळयात जाणे शक्य होत नसणे, या दुर्गम आदिवासी पाडयांमध्ये अनेक विद्यार्थी प्रतिकूल नैसर्गिक परिस्थितीमुळे शिक्षणापासून वंचित रहात असणे, पावसाळयात येथील नदी-नाल्यांना पूर येत असल्यामुळे या विद्यार्थ्यांना शिक्षण मिळावे यासाठी शासनाने काही निवासी शाळा सुरु करणे, येथे विद्यार्थी उत्तम शिक्षण घेत असले तरी त्यांचे बालपण हिरावून घेतले जात असणे, विद्यार्थ्यांना कुटुंबापासून दूर रहावे लागत असणे, याउलट जिल्हा परिषद शाळांतील विद्यार्थी दुपारी घरी गेल्यानंतर आई-वडील व कुटुंबियांसोबत वेळ घालवत असल्याने त्यांची आकलन क्षमता निवासी शाळांतील विद्यार्थ्यांपेक्षा अधिक असणे, त्यामुळे दुर्गम भागातील आदिवासी पाडे व गावांमधील विद्यार्थ्यांना घराजवळच दर्जेदार शिक्षण घेता यावे, त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणता यावे, यासाठी अशा भागातील जिल्हा परिषद शाळा टिकवून ठेवण्यासाठी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(४) श्री. महेश शिंदे, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीबर चर्चा उपस्थित करतील.**

"राज्यात खाद्य उद्योगांमध्ये पदार्थाचे आकर्षण ग्राहकांला होण्याकरिता वेगवेगळे खाद्य रंग वापरले जात असणे, नैसर्गिक रंग वनस्पती, प्राणि आणि खनिजांमधून मिळविले जात असणे, कृत्रिम रंग रासायनिक प्रक्रियेव्दारे तयार करण्यात येणे, सदरहू खाद्यरंग हे आरोग्यास अपायकारक असून देखील त्यांना आयएस मानांकन दिले जात असणे, रासायनिक रंगामुळे खाद्यपदार्थाचे आकर्षण वाढविण्यासाठी सिंथेटिक पदार्थाचा वापर करण्यात आल्यामुळे ते मानवाच्या आरोग्यास अपायकारक असणे, यातील कित्येक रंगामुळे कॅन्सर व अन्य रोग उद्‌भवत असल्यामुळे मानवी आरोग्यास अपायकारक असणे, त्यामुळे अन्य देशांत असे रंग वापरण्यास बंदी घातलेली असतांना देखील आपल्या देशात सर्रासपणे त्याचा वापर होत असणे, नैसर्गिक रंगाचा वापर खाद्यपदार्थांमध्ये करण्याची आवश्यकता, यामुळे राज्यातील शेतकऱ्यांना त्याचा फायदा होणार असणे, या संदर्भात केंद्र शासनाचा आयएस स्टँडर्डचे मानांकन बदलण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने खाद्यपदार्थामध्ये वापरण्यात येणाऱ्या खाद्य रंगाचे टॉक्सिक स्टडी करुन त्यांच्या मानांकनामध्ये बदल करण्याबाबत कायदा करण्याची आवश्यकता, निसर्गाचे रक्षण करण्यासाठी आणि नवीन उर्जा स्त्रोतांचा शोध घेण्यासाठी प्रगत तंत्रज्ञान आत्मसात करण्यासाठी क्वांटम फिजिक्स आणि बायोलॉजिकल अप्लाईड सायन्सचा वापर करुन औद्योगिक क्षेत्रामध्ये लॅब आणि त्यावरती संशोधन करण्यासाठी विद्यार्थ्यांना इन्फ्रास्टक्चर उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(५) श्री. अस्लम शेख, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीबर चर्चा उपस्थित करतील.**

"मुंबईच्या पश्चिम उपनगरातील मालाड (प) मालवणी, दादासाहेब गायकवाड नगर येथे म्हाडाचे २५०० बैठे निवासी गाळे असणे, शासनाने दि. १८/०५/१९८७ रोजीच्या शासन निर्णयान्वये बैठे निवासी गाळे विक्री योजना लागू करण्यात येणे, त्यानुसार सन १९९३ मध्ये गाळेधारकांच्या संमती पत्रकानुसार परवानगी देण्यात येणे, परंतू सदर योजनेस अत्यल्प प्रतिसाद मिळणे, २५०० बैठे निवासी गाळेधारकांपैकी १४२९ निवासी गाळयांना विक्री योजनेअंतर्गत सहभागी करण्यात येणे, उर्वरित १०७१ बैठे निवासी गाळेधारक अपरिहार्य कारणामुळे योजनेत सहभागी न होणे, बैठे निवासी गाळेधारक अत्यल्प उत्पनधारक असल्याने सदरच्या विक्री योजनेत सहभागी होता आलेले नसणे, शासनाने १०७१ बैठे निवासी गाळे धारकांसाठी नवीन विक्री योजना जाहिर करुन निवासी गाळे हस्तांतरीत करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(६) श्री. सत्यजित देशमुख, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीबर चर्चा उपस्थित करतील.**

"चांदोली (ता.शिराळा, जि.सांगली) धरण/अभयारण्य परिक्षेत्रातील गावांचे पुनर्वसन सन १९७८ ते २००० या कालावधीत सांगली, कोल्हापूर या ठिकाणी करण्यात येऊनही प्रकल्पग्रस्तांना कोणत्याही नागरी सोयी सुविधा उपलब्ध न केल्याचा गंभीर प्रकार माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास येणे, सदरहू ठिकाणाच्या प्रकल्पग्रस्तांना पर्यायी गावठाण जमीन देण्याचे आश्वासन शासनाकडून देण्यात येणे, प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करताना त्यांच्या मूळ गावातील घरांची आणि जमिनींची नुकसान भरपाई देऊन सरकारने जमीन व घरांचे संपादन करुन नुकसान भरपाई पोटी देण्यात आलेल्या रक्कमेतून शासनाने प्रकल्पग्रस्तांची मूळ जमीन संपादन करताना ६५ टक्के रक्कम कापून घेण्याबरोबरच पुनर्वसनासाठी पात्र होण्यासाठीची पुनर्वसन कायद्याची ११ ते १४ कलमे लागू करावी लागतात ती केलेली नसणे, प्रकल्पग्रस्त पुनर्वसनासाठी पात्रच होऊ न शकणे, प्रकल्पग्रस्तांनी वारंवार मा.मुख्यमंत्री, महसूल मंत्री, मदत व पुनर्वसन मंत्री, वने मंत्री तसेच लोकप्रतिनिधीं, जिल्हाधिकारी कार्यालय व उप वन संरक्षक यांच्याकडे निवदने, आंदोलने करुन सुध्दा त्यांना अद्यापी न्याय मिळालेला नसणे, उपरोक्त गंभीर प्रकारामुळे चांदोली धरणग्रस्त/अभयारण्य प्रकल्पग्रस्तांमध्ये शासनाप्रती प्रचंड नाराजी व असंतोषाची भावना निर्माण होणे, या गंभीर प्रकरणी चौकशी करुन, प्रकल्पग्रस्तांना पुनर्वसन कायदयातील कलम ११ ते १४ लागू करण्यासाठी कार्योत्तर मंजुरी देऊन प्रकल्पग्रस्तांना पर्यायी जमीन, मोबदला व सर्व सोयी सुविधांची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही वा उपाययोजना."

**(७) श्री. गोपीचंद पडळकर, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीबर चर्चा उपस्थित करतील.**

"महाराष्ट्रातील होलार समाज अनुसूचित जातीतील (SC) २६ व्या क्रमांकावर असून या समाजाचा पारंपारिक व्यवसाय वाद्य वाजविणे, जुन्या चपला शिवणे हा असणे, या समाजाकडे शेत जमीन नसल्याने तारण मिळत नसणे, त्यामुळे उद्योग व्यवसायासाठी कर्जही मिळत नसणे, तसेच शिक्षणाचे प्रमाण कमी असल्याने बेरोजगारी व गरीबीचे प्रमाण जास्त असणे, महाराष्ट्र शासनाने १९७४ साली होलार, चांभार, ढोर व मोची या समाजासाठी संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ स्थापन करणे, परंतु सदर महामंडळ स्थापनेपासून होलार समाजाला या महामंडळामध्ये कोणत्याही प्रकारचे प्रतिनिधीत्व मिळालेले नसणे, सदर महामंडळ स्थापनेपासून अध्यक्ष व संचालक नसणे, माहिती अधिकाराखालील माहितीच्या आधारे असे दिसून येणे की २% सुध्दा कर्ज वाटप झालेले नसणे, त्यामुळे होलार समाजासाठी स्वतंत्र आर्थिक विकास महामंडळ स्थापन करणे गरजेचे असून याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे केलेली असणे, राज्यात ५० लाखाच्या पुढे होलार समाजाची लोकसंख्या असून महाराष्ट्रातील विविध भागात व्यवसायानुसार मातंग, चांभार, मोची अशा चुकीच्या नोंदी लागलेल्या असल्याचे डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था पुणे यांनी नेमलेल्या अभ्यास गटाने सिध्द करणे, त्यामुळे होलार समाजाच्या सर्वांगिण विकासासाठी स्वतंत्र आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(८) श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीबर चर्चा उपस्थित करतील.**

"मानवी स्वास्थ्याच्या समस्या दिवसेंदिवस वाढत असणे, अश्या स्थितीत समाजाला स्वास्थपूर्ण व समृध्द बनविण्यासाठी योगसाधनेशिवाय पर्याय नसणे, वैश्विक स्तरावर देखील उत्तम शारिरीक स्वास्थ्याचा पर्याय म्हणून योगास मान्यता मिळणे, योगसाधनेबाबत जनजागृती करून समाजाला सुदृढ ठेवण्यासाठी योगशिक्षक स्वयंप्रेरणेने व निस्वार्थ वृत्तीने निरंतर कार्य करीत असणे, गुजरात, हरीयाणा, राजस्थान या राज्यांप्रमाणे महाराष्ट्रात योग आयोग स्थापन करण्याची आवश्यकता, महाराष्ट्र योग शिक्षक संघ या संघटनेने महाराष्ट्रात योग आयोग स्थापन करावा या प्रमुख मागणीसह इतर काही महत्वपूर्ण मागण्या शासनाकडे केलेल्या असणे, सदर मागण्यांची तातडीने पूर्तता होण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(९) श्री. संजय केळकर, वि.स.स.**

"राज्यातील अनेक विकास प्रकल्पांना महारेराने बजाविलेल्या नोटीसा" या विषयावरील श्रीमती सरोज अहिरे व इतर वि.स.स. यांचा तारांकित प्रश्न

क्रमांक ५०० ला दिनांक २१ मार्च, २०२५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

**अशासकीय कामकाज**

**(बैठकीच्या अखेरचे २ १/२ तास)**

**पंधरा : (१) अशासकीय विधेयके :-**

**(अ) पुर:स्थापनार्थ :-**

(१) **श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे** सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ८२ - महाराष्ट्र भाडे नियंत्रण (सुधारणा) विधेयक, २०२५.

(२) **ॲड. राहुल कुल, वि.स.स. यांचे** सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ८४ - महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२५.

**(ब) विचारार्थ :-**

**(बुधवार, दिनांक १६ जुलै, २०२५ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली अशासकीय विधेयके) (क्रमांक १ व २)**

(१) **श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे** सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५ - कारागृहे (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२५.

(२) **श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे** सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक १६ - महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध (सुधारणा) विधेयक, २०२५.

**(२) अशासकीय ठराव (म.वि.स. नियम १०६ अन्वये) :-**

**(शुक्रवार, दिनांक ४ जुलै, २०२५ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या परंतु पुढे ढकलण्यात आलेल्या अशासकीय ठरावांच्या सूचना) (क्रमांक १ ते ३)**

**(१) डॉ. नितीन राऊत, वि.स.स. यांचा ठराव क्र. १०३**

"राज्यात अनेक ठिकाणी रस्ते अपघात होऊन दरवर्षी हजारो नागरिकांचे प्राण या अपघातात गमवावे लागणे, राज्याचे राष्ट्रीय

महामार्ग व राज्य महामार्गांवर मोठया प्रमाणामध्ये अशा प्रकारचे अपघात होत असणे, हे अपघात रोखण्यासाठी उपाययोजना करण्याची नितांत आवश्यकता असणे, अपघातस्थळी अपघातग्रस्तांवर उपचार करण्यासाठी शासकीय रुग्णालयेही आसपास नसणे, या अपघातग्रस्तांवर उपचार करण्यासाठी राष्ट्रीय महामार्गांवर आरोग्य विभागाच्या माध्यमातून लहान उपचार केंद्र सुरु करण्याची आवश्यकता असणे, तसेच या उपचार केंद्रांमध्ये वैद्यकीय अधिकारी, स्टाफ, नर्सेस व इतर कर्मचाऱ्यांची नेमणूक देखील करण्याची आवश्यकता असणे, राज्य महामार्ग व राष्ट्रीय महामार्गांवर पन्नास किलोमीटर अंतरावर प्रत्येक ठिकाणी एक-एक उपचार केंद्र ट्रॉमा सेंटर (Trauma Center) उघडल्यास अपघातग्रस्तांचे प्राण वाचवणे शक्य होणार असणे व यामधून दरवर्षी वाढत असलेली अपघातातील मृतांची संख्या देखील आटोक्यात आणण्यास निश्चितच मदत होणार असणे, तरी शासनाने राष्ट्रीय महामार्ग व राज्य महामार्गांवरील अपघातग्रस्तांच्या बचावासाठी ट्रॉमा सेंटर (Trauma Center) उभारण्याबाबत तातडीने उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**(२) श्री. धनंजय मुंडे, वि.स.स. यांचा ठराव क्र. ३३**

"राज्यात किल्ल्यांचे ऐतिहासिक महत्त्व लक्षात घेता किल्ल्यांचे परिसर पर्यटन केंद्र म्हणून विकसित करण्यात यावीत तसेच त्या ठिकाणी मार्गदर्शक नेमण्याबाबत व पर्यटकांसाठी अन्य आवश्यक त्या सोयी-सुविधा उपलब्ध करुन देऊन या सर्व पुरातन किल्ल्यांचे ऐतिहासिक महत्व कायम राखण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**(३) श्री. राजकुमार बडोले, वि.स.स. यांचा ठराव क्र. ४३**

"दारिद्रय रेषेखालील कुटूंबांची यादी तयार करताना राज्यात अनेक कुटूंबांचे सर्वेक्षण न होणे, त्यामुळे खरोखरच दारिद्रय रेषेखाली असणाऱ्या कुटूंबांना पिवळया रंगाच्या शिधापत्रिकांपासून वंचित रहावे लागणे, शासनाच्या वतीने रुपये १५,००० उत्पन्न मर्यादा ठरविणे, मात्र वाढती महागाई आणि रुपयाचे झालेले अवमूल्यन यामुळे रुपये ५०,००० इतकी वार्षिक उत्पन्न मर्यादा पात्र धरण्याची गरज निर्माण होणे, यामुळे राज्यातील आर्थिकदृष्टया दुर्बल जनतेला दारिद्रय रेषेखालील योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे इष्टांक वाढवून घेण्याची मागणी करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**(दिनांक १५ जुलै, २०२५ रोजी बॅलटव्दारे काढण्यात आलेल्या अशासकीय ठरावांच्या सूचना) (क्रमांक ४ ते ६)**

**(४) श्री. राजकुमार बडोले, वि.स.स. यांचा ठराव क्र. ३९**

"राज्यात अनाथ, निराधार, परितक्त्या, घटस्फोटित, विधवा व अनैतिकतेतून मातृत्व लाभलेल्या आपदग्रस्त व शिक्षणाचा अभाव असणाऱ्या महिलांचा यात होणारा शारीरिक, मानसिक व सामाजिक छळ थांबवून त्यांची शैक्षणिक, आर्थिक व सामाजिक उन्नती होण्याच्या दृष्टीने महिलांना आत्मनिर्भर करण्यासाठी शासनाने कालबध्द कार्यक्रम आखून त्याची त्वरीत अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**(५) ॲड. पराग अळवणी, वि.स.स. यांचा ठराव क्र. ५०**

"राज्यातील प्रमुख शहरातून मोठ्या प्रमाणात वाढत असलेली अनधिकृत बांधकामे, त्याला आळा घालण्यास स्थानिक संस्थांचे तसेच शासनाचे झालेले दुर्लक्ष, त्यामुळे निर्माण झालेली परिस्थिती व समस्या याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**(६) श्री. प्रशांत ठाकूर, वि.स.स. यांचा ठराव क्र. १५१**

"राज्यात नामांकित कंपन्यांच्या औषधांच्या किंमती भरमसाठ असल्यामुळे ही महाग औषधे खरेदी करून उपचार करणे गोरगरीब व सामान्य जनतेला परवडणारे नसल्यामुळे औषधाअभावी अनेक रुग्णांना मृत्युला सामोरे जावे लागत असणे, जेनेरिक औषधांचा गुणही नामांकित कंपनीच्या औषधा प्रमाणेच येत असणे, तसेच औषधांच्या किंमती वाजवी दरात असल्याने त्या गोरगरीब जनतेला मिळणे आवश्यक असल्याने राज्यातही जेनेरिक औषधे खरेदी करून जनतेला ती उपलब्ध करून देण्याबाबत सर्व गावपातळीवर व शहरांमधून जेनेरिक औषधांची दुकाने सुरु करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

# "राष्ट्रगीत "

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : १७ जुलै, २०२५

**जितेंद्र भोळे,**
सचिव - १,
महाराष्ट्र विधानसभा